रविवार, १३ फेब्रुवारी २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २०७
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## शिवसेनेनेच भाजपच्या पाठीत खंजीर खुपसला –दानवे



**नागपूर :** आमच्यासोबत निवडणूक लढवून शिवसेनेने महाराष्ट्रभर मते मागितली आणि ऐन सत्तास्थापनेच्या वेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या विचारधारा न पटणाऱ्या पक्षांसोबत जाऊन सत्ता स्थापन केली. आम्ही कुणाच्याही पाठीत खंजीर खुपसला नाही, तर शिवसेनेनेच आमच्या पाठीत खंजीर खुपसला, असे प्रत्युत्तर रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी गोव्यात केलेल्या वक्तव्याला दिले. आम्ही कुणाच्याही वाट्याला जात नाही. कायदा त्याचे काम करतो. त्यामध्ये आम्ही हस्तक्षेप करीत नाही. ज्यांची कृत्य जशी आहेत, तशीच फळे त्यांना मिळत आहेत. त्यासाठी आम्हाला दोषी धरणे योग्य नाही. आम्हाला बोलण्याच्या आधी त्यांनी आपले आचरण सुधारावे. आम्ही आमच्या शब्दावर तेव्हाही ठाम होतो आणि आजही आहोत, असेही दानवेंनी या वेळी म्हटले. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

### अंतरंग

पनवेल मनपातर्फे आज विशेष लसीकरण सत्र/२

अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थप्रहर/४

भारतीय क्रिकेट संघाचा विंडीजला ‘व्हाईटवॉश’/६

### आयपीएल मेगा ऑक्शन २०२२

# देशी खेळाडूंनी खाल्ला ‘भाव’

| इशान किशन (मुंबई इंडियन्स) | दीपक चहर (चेन्नई सुपर किंग्ज) | श्रेयस अय्यर (केकेआर) | शार्दुल ठाकूर (दिल्ली कॅपिटल्स) | हर्षल पटेल (आरसीबी) |
|---|---|---|---|---|
| १५.२५ कोटी | १४ कोटी | १२.२५ कोटी | १०.७५ कोटी | १०.७५ कोटी |



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

क्रीडाविश्वाचे लक्ष लागून राहिलेल्या इंडियन प्रीमिअर लीगच्या १५व्या पर्वासाठी शनिवारी (दि. १२) मेगा ऑक्शनला प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी भारतीय खेळाडूंनी ‘भाव’ खाल्ला.

मुंबईकर युवा खेळाडू इशान किशनला मुंबई इंडियन्सने तब्बल १५.२५ कोटींची बोली लावत संघात कायम ठेवले.

याखालोखाल दीपक चहरला चेन्नई सुपर किंग्जने १४ कोटी रुपये देऊन संघात कायम ठेवले, तर १२.२५ कोटी रुपये मोजून श्रेयस अय्यरला कोलकाता नाईट रायडर्सने आपल्या ताफ्यात घेतले आहे. याशिवाय शार्दुल ठाकूरला दिल्ली कॅपिटल्सने आणि हर्षल पटेलला रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूने प्रत्येकी १०.७५ कोटी देऊन आपल्या संघात स्थान दिले. दोन दिवस हा लिलाव होणार असून ५९० खेळाडूंपैकी २१७ खेळाडूंची लॉटरी लागणार आहे.

### रैना, मिलर, स्मिथ, हसन अनसोल्ड

आयपीएल २०२२च्या ऑक्शनमध्ये पहिल्या दिवशी काही प्रमुख खेळाडू अनसोल्ड राहिले आहेत. यात मिस्टर आयपीएल सुरेश रैनाचाही समावेश आहे. ३५ वर्षीय रैना मागील मोसमात फ्लॉप ठरला होता. त्यामुळे कोणत्याही फ्रेंचायझीने त्याच्या नावावर लिलावात रस दाखवला नाही. टी–२० लीगमधील स्फोटक फलंदाजांपैकी एक असलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या डेव्हिड मिलरवरही कोणत्याही फ्रेंचायझीने रस दाखवलेला नाही. याशिवाय ऑस्ट्रेलियाचा दिग्गज फलंदाज स्टीव्ह स्मिथ आणि बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसन अनसोल्ड राहिला आहे.

## विकासकामांना विरोध करून अस्तित्व टिकवण्याचा शेकापचा केविलवाणा प्रयत्न



■ सभागृह नेते परेश ठाकूर यांची टीका

■ तोंडरे येथे नाला कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्ष विकासकामांना विरोध करून स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असल्याने त्यांची दुर्दशा झाली असल्याची टीका पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी (दि. १२) केली. तोंडरे येथे महापालिकेच्या माध्यमातून एक कोटी २६ लाख रुपये खर्चून पावसाळी नाल्याचे काम करण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून पनवेल महापालिका क्षेत्राचा सर्वांगीण विकास होत आहे. महापालिकेच्या प्रभाग समिती ‘अ’मधील तोंडरे गावातील वरचा पाड्यात बामा भिवा पाटील यांच्या घरापासून ते खालच्या पाड्यातील सोपान बाळाराम पाटील यांच्या घरापर्यंत एक कोटी २६ लाख रुपयांच्या पावसाळी नाल्याचे काम करण्यात येत आहे. या कामासाठी प्रभाग समिती ‘अ’चे माजी सभापती शत्रुघ्न काकडे आणि भाजप कार्यकर्ते महेश पाटील यांनी केलेला पाठपुरावा यशस्वी झाला आहे.

या विकासकामाच्या भूमिपूजन समारंभास महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, प्रभाग समिती ‘अ’च्या सभापती संजना कदम, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष दिनेश खानावकर, पडघ्याचे माजी सरपंच कृष्णा पाटील, भाजप नेते प्रकाश खैरे, अशोक साळुंखे, ज्ञानेश्वर डोंगरे, युवा नेते महेश पाटील, तोंडरे गावचे माजी उपसरपंच श्रीनाथ पाटील, बूथ अध्यक्ष अभिमन्यू पाटील, युवा कार्यकर्ते मेघनाथ पाटील, संदीप पाटील, धनाजी पाटील, हरिश पाटील, रोशन पाटील, अरुण पाटील, बाळाराम पाटील, मोहन पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

आपल्या भाषणात सभागृह नेते परेश ठाकूर पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा नेहमीच विकासकामांना प्राधान्य देत असतो. नागरिकांना सुविधा देण्याचे काम करीत आहे. यात शेकापकडून अडथळा आणला जातो, मात्र अशा प्रकारच्या कोणत्याही अडथळ्यांना भाजप घाबरत नाही. विकासकामांमुळेच भाजपने सर्व नागरिकांच्या हृदयामध्ये स्थान मिळवले आहे. आम्ही जनतेसाठी कामे करीतच राहणार.



### विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीकडून

## आरपीआय नेते जगदिश गायकवाड यांच्या तडीपारीचा जाहीर निषेध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे यासाठी सुरू असलेल्या चळवळीत प्रामुख्याने सहभागी असलेले आरपीआयचे कोकण प्रांत अध्यक्ष व पनवेल महापालिकेचे माजी उपमहापौर जगदिश गायकवाड यांना पोलिसांच्या माध्यमातून ठाकरे सरकारने तडीपारीचा जो आदेश काढला आहे, त्याचा लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने जाहीर निषेध केला आहे. त्या संदर्भातील निषेधाचे पत्रक समितीच्या वतीने काढण्यात आले आहे.

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे यासाठी सुरू असलेल्या आंदोलनात मुंबई, रायगड, ठाणे, पालघर जिल्ह्यांतील प्रकल्पग्रस्त भूमिपूत्र एकवटला आहे. या आंदोलनात सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा सहभाग आहे. त्याप्रमाणे आरपीआयचे नेते व नगरसेवक जगदिश गायकवाडही सहभागी आहेत. त्यांनी या चळवळीत बहुजन समाजाचे प्रश्न हिरीरीने मांडले व हा लढा पुढे नेण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. त्यामुळे ही चळवळ अधिक फोफावली. असे असताना चळवळ दडपण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने त्यांना पोलिसांच्या माध्यमातून तडीपारीचा आदेश काढला, परंतु ही चळवळ आता अधिक जोमाने फोफावेल हे सरकारने लक्षात घ्यावे. या तडीपार आदेशाचा लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती जाहीर निषेध करीत असून लवकरच राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील यांची भेट घेऊन त्यांना हा आदेश रद्द करण्यासाठी निवेदन देण्यात येईल, असे कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील व कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

## उद्योगपती राहुल बजाज यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**



ज्येष्ठ उद्योगपती पद्मभूषण राहुल बजाज यांचे शनिवारी (दि. १२) पुण्यात निधन झाले. वयाच्या ८३व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

राहुल बजाज हे आजारपणामुळे पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये मागील काही दिवसांपासून दाखल होते. वयोमान आणि हृदयाच्या आजारामुळे त्यांच्यावर उपचार करण्यास डॉक्टरांना मर्यादा येत होत्या.

### निवडक

**...तर ड्रायव्हिंगदरम्यान फोनवर बोलणे ठरणार कायदेशीर!**

**नवी दिल्ली :** गाडी चालवताना तुम्ही फोनवर बोलू शकता, परंतु फोन तुमच्या हातात नसावा. हॅण्डफ्री उपकरण वापरून तुम्ही फोनवर बोलू शकता. याविषयीची घोषणा लोकसभेत केली जाईल, असे केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. या पद्धतीने तुम्ही फोनवर बोललात तर तो गुन्हा ठरणार नाही. या परिस्थितीत वाहतूक पोलीस तुमच्याकडून दंड आकारू शकत नाहीत, पण पोलिसांनी अशी कारवाई केल्यास तुम्ही त्यांच्याविरोधात कोर्टात जाऊ शकता, असेही त्यांनी सांगितले.

**जम्मू–काश्मीरमध्ये कट उधळला; दहशतवाद्यांसह सात जण अटकेत**

**श्रीनगर :** जम्मू काश्मीर खोऱ्यात अल–बद्र सोपोरमध्ये पोलिसांनी सुरक्षा दलांवर हल्ले करणाऱ्या चार दहशतवाद्यांसह सात आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

### माणगावमध्ये मध्यरात्री थरार!

## दुचाकीवरून आलेल्या दुकलीने झाडल्या गोळ्या; तरुण गंभीर



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील कचेरी रोड मार्गावर शनिवारी (दि. १२) रात्री १२.१०च्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी मेडिकलचे दुकान बंद करून पायी चालत जाणाऱ्या तरुणावर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. यानंतर हल्लेखोर पळून गेले. या गोळीबारात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी मुंबईला हलविण्यात आले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार घटनेतील फिर्यादी दीपक रामकिशोर यादव व जखमी तरुण शुभम ग्यानचंद जैस्वाल (वय २४, रा. माणगाव) हे आपले मेडिकल दुकान बंद करून घरी पायी चालत जात होते. त्या वेळी कचेरी रोड येथून एक काळ्या रंगाची पल्सर मोटरसायकल त्यांच्यासमोर आली आणि चालकाने इंदापूरला जाणारा रस्ता कोठे आहे असे त्यांना विचारले. तेव्हा शुभम त्यांना रस्ता सांगत असताना दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या दुसऱ्याने त्याच्याजवळील पिस्तुलने शुभमवर गोळ्या झाडल्या. त्यानंतर ते मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाने इंदापूर बाजूकडे पळून गेले.

या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेची माहिती समजताच जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अलिबाग येथून श्वानपथकालाही पाचारण करण्यात आले, मात्र या घटनेमागचे कारण अद्याप समजू शकले नसून माणगाव पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## ७ नोव्हेंबर राष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा करावा

### राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची सूचना



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिक्षणाबाबतची ओढ आणि निष्ठेचे आजच्या युगात स्मरण करण्यासाठी ७ नोव्हेंबर हा राष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा करावा, अशी सूचना महामहीम राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी शनिवारी (दि. १२) येथे केली.

मंडणगड तालुक्यातील डॉ. आंबेडकर यांच्या मूळ गाव असलेल्या आंबडवे येथे राष्ट्रपती कोविंद यांनी भेट देऊन आदरांजली अर्पण केली. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रपतींच्या पत्नी सविता कोविंद, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, पालकमंत्री अनिल परब, राज्यमंत्री संजय बनसोडे, जि. प. अध्यक्ष विक्रांत जाधव, खासदार सुनील तटकरे, राष्ट्रीय भटके विमुक्त जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष भिकू उर्फ दादा इदाते उपस्थित होते.

राष्ट्रपती कोविंद पुढे म्हणाले की, ६ डिसेंबर हा डॉ. आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन म्हणून साजरा केला जातो. २०१५ सालापासून २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून राष्ट्रीय पातळीवर साजरा केला जात आहे. १४ एप्रिल रोजी बाबासाहेबांची जयंती सर्वत्र साजरी होते. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. कारण याच दिवशी १९०० साली बाबासाहेबांनी शाळेमध्ये प्रवेश घेऊन शिक्षणाचा श्रीगणेशा केला होता. मला असे वाटते की, राष्ट्रीय पातळीवरील डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणविषयक ओढ आणि निष्ठेचे स्मरण करून देण्यासाठी तो साजरा करणे आवश्यक आहे. येथे बसलेल्या संसदेतील सदस्यांनी याबाबत पुढाकार घ्यावा, मी त्यांना माझ्या परीने मदत करीन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याशी संबधित पाच ठिकाणांना पंचतीर्थाचे नाव देऊन केंद्र सरकारने या सर्व ठिकाणी आदरांजली अर्पण करण्याची स्तुत्य पद्धत सुरू केली आहे. त्यांची जन्मभूमी, नागपूरची दीक्षाभूमी, दिल्लीचे परिनिर्वाण स्थळ, मुंबईची चैत्यभूमी आणि लंडनमधील आंबेडकर मेमोरियल होम या पाच ठिकाणी बाबासाहेबांचा आदर्श मानणारे लोक श्रद्धांजली अर्पण करतात. माझी सरकरला अशी सूचना आहे की, याच मालिकेत बाबासाहेबांचे मूळ गाव असलेल्या आंबडवे येथील स्मारकही तीर्थस्थळ म्हणून घोषित करण्यात यावे आणि या गावाचे स्फूर्तीभूमी असे नामाभिधान करण्यात यावे.

## दुचाकीची म्हशीला ठोकर; दोन तरुणांचा मृत्यू

■ नांदगाव–पाली मार्गावर अपघात

**पाली : प्रतिनिधी**

पाली–नांदगाव मार्गावर म्हशीला ठोकर लागून झालेल्या मोटरसायकल अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू, तर दुसऱ्याचा उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाल्याची घटना घडली. नांदगाव–पाली मार्गावर हा अपघात झाला.

रमेश शांताराम पवार (वय २४) हा आपल्या ताब्यातील डिस्कव्हर कंपनीची मोटरसायकल (एमएच ०६–बीएच ६४५५) स्वतः चालवत मागील सीटवर संतोष पवार याला घेऊन जात होता. नांदगावच्या हद्दीत अचानक रस्त्यात म्हशी आडव्या आल्याने ठोकर होऊन अपघात झाला. यात रमेश पवार मयत झाला, तर गंभीर जखमी संतोष पवारचा अधिक उपचारासाठी नेताना मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पाली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कर्नाळा बँक ठेवीदारांकडून भाजप नेते किरीट सोमय्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा बँकेत झालेला कोट्यवधींचा घोटाळा उघडकीस आणून ठेवीदार आणि खातेदारांना त्यांचे हक्काचे पैसे परत मिळवून देण्याची आशा पल्लवित करून ती सत्यात उतरवण्यासाठी भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या संघर्ष करीत आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त कर्नाळा बँकेचे खातेदार आणि ठेवीदारांनी मनापासून शुभेच्छा दिल्या.

‘आम्हाला माहीत आहे कोणाच्या कर्तृत्वामुळे कर्नाळा बँक ठेवीदारांना पैसे मिळणार आहेत. शेकापचा आमदार किंवा कोणताही पदाधिकारी खातेदारांना न्याय मिळवून देण्यासाठी का पुढे आला नाही, असा रोखठोक सवाल ठेवीदार मच्छिंद्र कटेकर यांनी उपस्थित करून आमच्यासाठी प्रसंगी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे किरीट सोमय्या यांना दीर्घायुष्य मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना,



अशा शब्दांत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, तर भाजप सहकार सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष कुंडलिक काटकर यांनी, भ्रष्टाचार करणाऱ्यांचे कर्दनकाळ म्हणून ओळखले जाणारे किरीट सोमय्या यांच्या तत्परतेमुळेच कर्नाळा बँकेतील ठेवीदारांना आणि खातेदारांना न्याय मिळाला आहे. त्यामुळे त्यांचा वाढदिवस नेहमीच आठवणीत राहील, अशी भावना व्यक्त केली.

## काशीदमध्ये एकाचा खून

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशीद येथील एका विहिरीत ४० वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. ही खुनाची घटना असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याने मुरूड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मृतदेह आढळलेली विहीर रत्नाकर महाबळ रॉय यांच्या मालकीच्या जागेत असून ती काशीद गावापासून दूर व निर्जन जागी आहे. मृतदेहाच्या डोक्यावर गंभीर प्रहार केल्याने मोठी जखम झालेली आहे तसेच त्याच्या गळ्यात सिमेंट काँक्रिटचा खांब बांधलेला असल्याने त्याला या विहिरीत ढकलून दिल्याचा अंदाज आहे. या प्रकरणी मुरूड पोलीस अधिक तपास करीत आहेत.



## माघी एकादशीनिमित्त पंढरीनगरी दुमदुमली

**पंढरपूर : प्रतिनिधी**

कोरोना निर्बंध रद्द झाल्यानंतर शनिवारी (दि. १२) माघ महिन्यातील जया एकादशीनिमित्त मोठ्या संख्येने भाविक विठूरायाच्या दर्शनासाठी पंढपूरमध्ये जमले झाले होते. या सोहळ्यासाठी मंदिराला फुलांची आकर्षक आरास करण्यात आली होती. त्यामुळे देवाचे रूप अधिकच खुलून दिसून आले.

माघ महिन्याच्या शुक्ल पक्षात जी एकादशी येते तिला जया एकादशी म्हणतात. या व्रत आणि पूजेला विशेष महत्त्व आहे. माघी वारी मराठी वर्षातील शेवटची असल्याने भाविक या वारीला न चुकता येतात. यंदा राज्यातून जवळपास तीन लाख भाविक पंढरीत दाखल झाले होते. एकादशीनिमित्त विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांच्या, तर रुक्मिणीमातेची पूजा प्रांताधिकारी तथा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांच्या हस्ते सपत्नीक झाली.

भाविकांनी चंद्रभागा स्नान, नगरप्रदक्षिणा करून देवाचे दर्शन घेतले. दरम्यान, विठूरायाच्या जयघोषाने मंदिरासह शहरातील धर्मशाळा, मठ परिसर दुमदुमून गेला होता.

# शिवसेनेनेच पाठीत खंजीर खुपसला

## ▪ रावसाहेब दानवे यांचे आदित्य ठाकरेंना प्रत्युत्तर

**नागपूर : प्रतिनिधी**

आम्ही कुणाच्याही पाठीत खंजीर खुपसला नाही, तर शिवसेनेनेच आमच्या पाठीत खंजीर खुपसला, असे म्हणत केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी गोव्यात केलेल्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला.

आमच्यासोबत निवडणूक लढवून त्यांनी महाराष्ट्रभर मते मागितली आणि ऐन सत्तास्थापनेच्या वेळी दगाफटका करून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससारख्या विचारधारा न पटणाऱ्या पक्षांसोबत जाऊन सत्ता मिळविली. केवळ मुख्यमंत्र्याची खुर्ची येवढेच त्यांचे लक्ष्य होते, तर राज्याचा विकास हे आमचे लक्ष्य होते. हा दगाफटका करून शिवसेनेने केवळ आमच्याच पाठीत खंजीर खुपसला नाही, तर महाराष्ट्रातील जनतेशीसुद्धा बेईमानी केली आहे. कारण जनतेचा कौल भाजप-शिवसेनेला होता. तो शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससाठी नव्हता. आम्ही तेव्हाही आमच्या शब्दावरून फिरलो नाही, अन् आताही नाही, असे रावसाहेब दानवे म्हणाले.



भाजप नेते महाविकास आघाडीच्या नेत्यांना टारगेट करत असल्याचा आरोप केला जातो, याबाबत छेडले असता दानवे म्हणाले की, आम्ही कुणाच्याही वाट्याला जात नाही. कायदा त्याचे काम करत असतो, त्यामध्ये आम्ही हस्तक्षेप करीत नाही. त्यांची कृत्य जशी आहेत, तशीच फळ त्यांना मिळत आहेत. त्यासाठी आम्हाला दोषी धरणे कदापिही योग्य नाही. आम्हाला बोलण्याच्या आधी त्यांनी आपले आचरण सुधारावे. आम्ही जाणीवपूर्वक काहीही करीत नाही. आम्ही आमच्या शब्दावर तेव्हाही ठाम होतो आणि आजही आहोत, असे ते म्हणाले.

दरम्यान, रेल्वेमध्ये यापुढे डबाबंद अन्न दिले जाणार नाही, तर तेथे शिजविलेले अन्न प्रवाशांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यासाठीचे नियोजन झालेले आहे. देशातील ८० कोटी लोकांना मोफत धान्य देण्याचे सरकारचे नियोजन आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात सहा हजार रुपये जमा केले जाणार आहेत. केंद्र सरकारने विदर्भालाही भरभरून दिलेले आहे. वर्धा नांदेड रेल्वे मार्गासाठी ३००० कोटी, वर्धा बल्लारशासाठी १८०० कोटी, वर्धा नागपूरसाठी ६०० कोटी आणि नागपूर नागभीडसाठी ११४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

# पनवेल मनपातर्फे आज १५ ते १८ वयोगटासाठी विशेष लसीकरण सत्र

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या लसीकरणासाठी महापालिकेच्यावतीने विशेष लसीकरण सत्राचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय पनवेल आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ खारघर येथे रविवारी (दि. १३) करण्यात आले आहे. ज्या मुलांनी आपले लसीकरण करून घेतले नाही त्यांनी आपल्या पहिल्या व दुसऱ्या डोसचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा जवळ आल्या असून या पार्श्वभूमीवर १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचे लवकरात लवकर लसीकरण होणे आवश्यक आहे. त्यामुळे पनवेल महापालिकेने उपजिल्हा रुग्णालय पनवेल आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ५ खारघर येथे सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत कोवॅक्सीन लसीच्या पहिल्या व दुसऱ्या डोसचे विशेष लसीकरण सत्राचे आयोजन केले असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

याशिवाय महापालिकेच्या अधिकृत लसीकरण केंद्रावरती कोविशिल्ड व कोवॅक्सीनचा दूसरा डोस व बूस्टर डोस सोमवार ते शनिवार उपलब्ध करून देण्यात आला आहे. आरोग्य कर्मचारी, पहिल्या फळीतील कर्मचारी, सहव्याधीग्रस्त् (कोमॉर्बिड) नागरिकांनी (प्रीकॉशनरी) बूस्टर डोस घ्यावा, असे आवाहन मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

महापालिका क्षेत्रातील विविध शाळांमध्ये १५ ते १८ वयोगटातील मुलांसाठी वेळापत्रकानुसार सोमवार ते शनिवार लसीकरण सुरू करण्यात आले आहे. शाळाबाह्य मुलांनीदेखील अधिकृत लसीकरण केंद्रावरती जाऊन लसीकरण करून घ्यावे. १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या पालकांनी आपल्या पाल्यांला व शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पालिकेने केले आहेत. जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी मुलांना लस देण्यासाठी आणि ऑनलाइन नोंदणी करावी. रोज होणारे लसीकरणाचे सेशन ऑनलाइन पद्धतीने प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या वतीने समाजमाध्यमावर प्रसिद्ध होणाऱ्या प्रेस नोट मध्येही रोजच्या लसीकरणाची माहिती देण्यात आहे.

# नेरूळ जेट्टी येथून परिवहन सेवा सुरू करा

## ▪ आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आगामी १७ फेब्रुवारीपासून जेट्टी सेवा सुरू होणार असून त्या पार्श्वभूमीवर टी एस चाणक्य, नेरूळ जेट्टी येथे नवी मुंबई परिवहन उपक्रमातील चार इलेक्ट्रिक बस उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी मनपा आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात आमदार मंदा म्हात्रे यांनी म्हटले आहे की, टी. एस.चाणक्य, करावे नेरूळ नवी मुंबई येथे जेट्टीचे काम पूर्णत्वास झाले असून या जेट्टीचे लोकार्पण १७ फेब्रुवारी २०२२ रोजी केंद्रीय मंत्री यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. जेट्टी येथे वॉटर टॅक्सी तसेच इतर सुविधा नागरिकांना मिळणार असून नेरूळ जेट्टी ते पनवेल व नेरूळ जेट्टी ते वाशी अशी सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध केल्यास सोयीचे होणार आहे. वॉटर टॅक्सी सुरु होणार असल्याने साहजिकच पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता महानगरपालिकेनेही सार्वजनिक वाहतूक प्रवासी सेवा देणे गरजेचे आहे.

नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत असलेल्या नवी मुंबई परिवहन उपक्रमाच्या चार इलेक्ट्रिक बस सद्यस्थितीत उपलब्ध करून द्याव्या, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी निवेदनातून आयुक्तांकडे केली आहे.

# महाविकास आघाडीतील मतभेद उफाळलेत

## ▪ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा दावा

**पुणे : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीची सद्याची स्थिती पाहिली तर कोणीही विश्लेषण करणारा सांगू शकेल की, हे सरकार फार दिवस टिकणार नाही. आघाडीतील मतभेद उफाळले आहेत. दोन मंत्र्यांचा राजीनामा झाला. तसे बाकीच्यांचेही होतील. अशी स्थिती निर्माण होईल की, आघाडीच्या नेत्यांना सत्ता सोडून घरी जावे लागेल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील म्हणाले.

भाजप कार्यकर्त्यांच्या विरोधात पोलिसांकडून होत असलेल्या पक्षपाती कारवाईच्या विरोधात पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांना निवेदन सादर केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेद उफाळले आहेत. आघाडीचे मंत्री एकापाठोपाठ तुरुंगाच्या दिशेने जात आहेत. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल १० मार्चला लागल्यानंतर अशी स्थिती निर्माण होईल की, महाविकास आघाडीला सत्तेवरून जावे लागेल, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

पोलिसांच्या बदल्यांबाबत माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी अनिल देशमुख यांच्याकडून यादी मिळत होती असे सांगितले. तर देशमुख म्हणतात की, त्यांना शिवसेनेचे मंत्री अनिल परब यांच्याकडून मिळत होती व ते ती पुढे पाठवत होते. दुसरीकडे आयपीएस अधिकारी परमवीरसिंग यांनी सांगितले की, सचिन वाझे याला पुन्हा नोकरीत घेण्यासाठी त्यांच्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी दबाव आणला होता. अनिल देशमुख यांच्या प्रकरणात उच्च न्यायालयाने सीबीआय चौकशीचा आदेश दिला तसा या गंभीर प्रकरणांबाबत न्यायालय न्याय देईल, असेही पाटील म्हणाले.

पिंपरी चिंचवड व महाराष्ट्रात ज्याप्रकारे सत्तेचा दुरुपयोग सुरू आहे तो आम्ही सहन करणार नाही. किरीट सोमय्या यांचा सत्कार करून पुण्यात भाजप कार्यकर्त्यांनी दाखवून दिले की, आम्हीही काही कमी नाही. पिंपरी चिंचवडमध्ये खोट्या केसेस करून पोलिसांमार्फत आम्हाला हे सरकार किती दाबणार, असा सवाल आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांना न्याय मिळाल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही. पोलिसांनी निःपक्षपातीपणे चौकशी केली नाही तर आपण न्यायालयात जाऊ, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.



# कामोठ्यात गरजूंना फॅमिली हॅप्पीनेस किट

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

माणसाने माणसाशी माणसा सम वागणे या संज्ञेला न्याय देण्याचे काम या कोरोना महामारीच्या काळात 'रॉबिन हूड आर्मी' ही एनजीओ करत आहे. या एनजीओने कामोठे सेक्टर २० मधील गरजवंत नागरिकांना तसेच पारधी लोकांना 'फॅमिली हॅप्पीनेस किट'चे शनिवारी (दि. १२) वाटप केले. या सामाजिक कार्यात अक्षय पात्र या संस्थेचे त्यांना किट उपलब्ध करून दिले आहेत.

रॉबिन हूड आर्मी या एनजीओने १०० नागरिकांना या फॅमिली किटचे वाटप करण्यात आले असून आतापर्यंत नवी मुंबई क्षेत्रात तीन हजार नागरिकांना किटचे वाटप करण्यात आले आहे. रॉबिन हूड आर्मी एनजीओचे दीपक सिंग यांनी गरीब व गरजू आढळण्यास आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले.

या वेळी भाजप भटके विमुक्त जमाती महिला सेलच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा विद्या तामखेडे, हार्दिक शहा, विनोद खेडकर, मनीषा वणवे, हंसराज वर्मा, वैदेही मॅडम, सागर पाटील आदी उपस्थित होते.

# उरण महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ई-परिषद

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने सेवाक्षेत्र : कोरोना दरम्यान आणि कोरोना नंतरच्या काळातील आव्हाने आणि संधी या विषयावर आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे आयोजन केले गेले.

या परिषदेत उद्घाटनीय कार्यक्रमात प्रो. डॉ. डेव्ह ओ.गोरमन (सॅन्ताफे कॉलेज फ्लोरीडा, अमेरिका) यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर कोव्हीड१९ चा प्रभाव या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. मुख्य अतिथी डॉ. राजेश राजपुरकर (माजी प्र-कुलगुरू, अमरावती विद्यापीठ) यांनी शिक्षण व्यवस्थेवर कोव्हीड१९ चा झालेला परिणाम या विषयी माहिती सांगितली. उपस्थितांचे स्वागत प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम गायकवाड यांनी तर प्रास्ताविक प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी केले. समारंभाचे अध्यक्ष कोकण ज्ञानपीठ कर्जतचे उपाध्यक्ष शिशीर धारकर यांनी युवा भारताचे भविष्य उज्ज्वल असल्याचे सांगितले तसेच प्रा. के. ए. शामा यांनी सर्वांचे आभार मानले तर सुत्रसंचलन प्रा. डॉ. पराग कारूळकर यांनी केले.व्दितीय सत्रात भारताच्या विविध राज्यातील एकुण तेरा संशोधकांनी आपले पेपर सादर केले. या सत्राचे वक्ते प्रा. डॉ. अजितकुमार (शासकीय महाविद्यालय, भिवानी, हरियाणा) हे होते तर अध्यक्ष डॉ. एलिझाबेथ मॅथ्युज या होत्या. पाहुण्यांचा परिचय व स्वागत प्रा. लिफ्टन कुमारी यांनी केले तर आभार प्रा.रियाझ पठाण यांनी मानले तसेच या सत्राचे सुत्रसंचलन प्रा. हन्नत शेख यांनी केले.




तिसऱ्या सत्रात प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विलास कुलकर्णी (सरदार पटेल विद्यापीठ, आनंद, गुजरात) हे होते. तर अध्यक्ष प्रा. डॉ.किशोरी भगत या होत्या. या सत्रात पाहुण्यांचे स्वागत व परिचय प्रा. मयुरी मढवी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. एम. जी.लोणे यांनी मानले. या सत्रात एकुण बारा संशोधकांनी आपले वेगवेगळ्या विषयावरील पेपर सादर केले.

सहभागीपैकी प्रा. डॉ. अभिषेक चंडोला यांनी या परिषदेविषयीच्या भावना व्यक्त केल्या. समारोपिय सत्राचे अध्यक्ष मा. डॉ. दीपक रावेरकर (प्राचार्य, सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपुर) हे होते. तर संपुर्ण परिषदेचे आभार प्रा. एच. के. जगताप यांनी व्यक्त केले. परिषदेत एकुण ५३ शोध निबंध सादर केले गेले. भारताच्या १३ राज्यातून २६५ विविध अभ्यासक संशोधक यांनी या परिषदेत सहभाग नोंदवला.

# मविआ सरकारचे वस्त्रहरण झाले -शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

१२ आमदार निलंबनाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निवाडा मान्य करताना महाराष्ट्र विधानभवनाने राष्ट्रपतींना भेटून हा निवाडा सर्वोच्च न्यायालयाच्या लार्जर बेंचकडे पाठवण्याची जी भूमिका घेतली त्याबाबत आपली बाजू मांडताना आमदार आशिष शेलार यांनी वेळ गेली, संधी गमावली आणि मागणी चुकली, अशी प्रतिक्रिया दिली आहे. आघाडी सरकारवर बोलताना, तानाशाही हारली, लोकशाही जिंकली आणि आघाडी सरकारचे वस्त्रहरण झाले, अशी टीकाही शेलार यांनी केली आहे.

मुंबई भाजप कार्यालयात शनिवारी (दि. १२) भाजप नेते आमदार आशिष शेलार यांनी पत्रकार परिषद घेतली. या वेळी त्यांनी विधानपरिषद सभापती, विधानसभा उपाध्यक्ष, विधान परिषद उपसभापती या तिघांचेही आमदार शेलार यांनी आभार मानले. यासोबतच राज्यातील महाविकास आघाडी सरकारवर टीका केली.

# जगदिश गायकवाड यांच्या तडीपारीचा स्वाभिमानी युथ रिपब्लिकनतर्फे निषेध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे कोकण प्रदेश अध्यक्ष जगदिश गायकवाड यांची राज्य शासनाने केलेल्या तडीपारीचा स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी निषेध केला आहे.

गेली ३० ते ३५ वर्षे जगदिश गायकवाड हे भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. रायगड, नवी मुंबई व महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारांच्या कार्यकर्त्यांचे व आरपीआय कार्यकर्त्यांचे ते आधारस्तंभ आहेत. मागासवर्गीय समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध त्यांनी अनेक यशस्वी आंदोलने केली आहेत. त्याबद्दल त्यांच्यावर अनेक गुन्हेही दाखल झाले आहेत व त्याचा ते समर्थपणे सामना करीत आहेत. अशा प्रकारे लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे, म्हणून करण्यात येत असलेल्या आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग आहे.

सर्वसामान्य जनतेची मागणी लावून धरण्यासाठी जर आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता आंदोलन करीत असेल आणि त्याच्यावर राज्य सरकार तडीपारीची कारवाई करीत असेल, तर स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष याचा जाहीर निषेध करीत आहे, असेही महेश साळुंखे यांनी म्हटले आहे.

(छाया : राकेश खराडे)



# हळदीकुंकू समारंभात रंगले विविध खेळ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री शारदा अभिनव प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित यांच्या माध्यमातून महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन आंबिवली येथे करण्यात आले होते. या वेळी महिलांकडून संगित खुर्ची, फुगडी, नृत्य आदी विविध खेळ खेळण्यात आले. विशेष म्हणजे या खेळासाठी मोल्यवान तसेच गृहपयोगी वस्तू बक्षिस म्हणून ठेवण्यात आले होते.

महिलांना आज घर व नोकरी सांभाळता तारेवरची कसरत करावी लागत आहे. महिला वर्ग आज शिक्षणात पुढे आहे. शिवाय कुटूंबाची सर्व जबाबदारी पार पाडत आहे. मुलांचे शिक्षण समवेत संसार सांभाळण्याचे मोठे धाडस तिच्यामध्ये निर्माण झाल्याचे दिसून येते. शिवाय कौटुंबिक जीवन जगत असतांना विविध समस्या येत असतात, मात्र त्यास न डगमगता त्या आपले काम यशस्वीपणे करत असतात, असे मार्गदर्शन संजना दळवी यांनी या समारंभात व्यक्त केले.

या वेळी श्री शारदा अभिनव प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित अध्यक्षा आश्विनी पिंगळे, उपाध्यक्ष मंदा कुरुंगळे, कार्याध्यक्षा मनिषा साळुंखे, सचिव अनघा आमले, सहसचिव संजना दळवी, खजिनदार निलम शिंदे, सहखजिनदार स्वप्नानी लभडे, सदस्या सुषमा मुंढे, मोनिका जाधव, ज्योती बुरुमकर, समिक्षा मोरे आदी उपस्थित होत्या.

माजी उपसरपंच जया जाधव, सीआरपी कमल जाधव, बचत गटातील वर्षा जाधव, कल्याणी जाधव, मीना पाटील, अस्मिता पाटील, भाग्यश्री पाटील, शारदा जाधव, सारिका जाधव, अंजली जाधव, पद्मा जाधव, शितल जाधव, प्रियंका जाधव, मनिषा जाधव, त्याच बरोबर गावातील महिला वर्ग उपस्थित होत्या.

# नवी मुंबईत विविध सामाजिक उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने नागरिकांसाठी सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. त्याचअनुषंगाने भाजप जुईनगर विभाग भाजपचे माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या वतीने असंघटित कामगारांना ई-श्रम कार्ड वाटप, नागरिकांसाठी आरोग्य शिबिर तसेच विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप आदी उपक्रम राबविण्यात आले.

या उपक्रमांचे उद्घाटन माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजपचे नवी मुंबई भाजपचे महामंत्री डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेविका माधुरी सुतार यासह कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्व उपक्रमांना परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून त्यांनी आयोजकांचे आभार मानले आहेत.



# भाजपतर्फे ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश प्रकोष्ठकडून करण्यात आले असून प्रदेश संयोजक डॉ. शुभा पाध्ये यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेची घोषणा झाली आहे. या स्पर्धेचा उद्देश युवा वर्गात 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानाविषयी जागृती निर्माण करणे हा आहे.

या स्पर्धेतून अनेक उत्तम वक्तृत्व असणाऱ्या व समाजापुढील प्रश्नांवर विचारमंथन करण्यास इच्छुक असणाऱ्या युवक युवतींना आपले विचार निर्भीडपणे मांडण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध केलेले आहे. जिल्हा संयोजक दक्षिण रायगड निलिमा राजेय भोसले यांनी या स्पर्धेत रायगडातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा, असे आवाहन केले आहे. प्रथम पारितोषिक २१ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक ११ हजार रुपये, तृतीय पारितोषिक सात हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही दिली जाणार आहेत.



स्पर्धेचे विषय आजची पिढी, तंत्रस्नेही पिढी; विचार मंथन-लग्नाचे वय २१; सृजनकर्ती मी, तरी अजूनही असुरक्षित मी; भारतीय स्त्री, आत्मनिर्भर स्त्री; मुलगी देशाची शान, प्रत्येक घराचा सम्मान असे असून १६ ते २५ वर्षे वयोगटातील मुले-मुलींसाठी असलेली ही खुली स्पर्धा आहे. स्पर्धेसाठी भाषा माध्यम मराठी, हिंदी, इंग्रजी पैकी एक निवडायचे असून स्पर्धा कालावधी २४ जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२२ पर्यंत आहे. यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग ३ ते ५ मिनिटांचे असावे तर व्हिडिओ साईज ५० ते ६० मेगाबाईटस्पेक्षा जास्त नसावी.

स्पर्धकाचे नाव, जन्म तारीख, संपर्क क्रमांक, राहता पूर्ण पत्ता तसेच स्पर्धकाचे आधारकार्ड अशी माहिती जोडायची आहे. व्हिडिओ आणि माहिती फक्त ईमेलद्वारे पाठवायचे असून अधिक माहितीसाठी निलिमा राजय भोसले (९१३००१६९६७) आणि अतुल प्रजापती (९८३३२९६६२२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन सपना सचिन बुटाला यांनी केले आहे.

## दुखवटा



### शरद देसाई

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पत्रकार संघाचे सचिव सचिन देसाई यांचे वडील शरद देवचंद देसाई (वय ८३) यांचे शनिवारी (दि. १२) माणगाव येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक लहान भाऊ, दोन मुलगे, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै. शरद देसाई हे माणगावातील प्रतिष्ठित व्यापारी म्हणून सर्वत्र परीचित होते. त्यांची बहुजन समाजात विशेष अशी ओळख होती. त्यांच्यावर माणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## निवडक

### चहाचे पैसे मागितले म्हणून मारहाण

**पनवेल :** चहाचे पैसे मागितले म्हणून नोकराला हाताबुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ करून दुकानातील सामानाची तोडफोड केल्याचा प्रकार कामोठे येथे घडला आहे. आरोपींविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन वरंडे यांचा चहा विक्रीचा व्यवसाय कामोठे सेक्टर १७ येथे आहे. दुकानात दोन व्यक्तींनी चहा पिऊन झाल्यावर चहाचे कसले पैसे असे बोलून शिवीगाळ करून काऊंटरवर ठेवलेले दोन चहाचे थर्मास जमिनीवर फेकले व दुकानांमध्ये प्रवेश करून सचिन यांना आणि त्यांचा नोकर याला हाताबुक्क्यांनी मारहाण केली. दुकान बंद करतो असे बोलून जीवे ठार मारण्याची धमकीही दिली तसेच दुकानातील इतर सामान अस्ताव्यस्त फेकून तोडफोड केली व नुकसान केले. त्यानंतर ते दोघेही व्यक्ती पळून गेले.

### कामोठ्यात औषधांची चोरी

**पनवेल :** आर्थिक फायद्यासाठी १२ लाख २४ हजार रुपयांच्या औषधांची चोरी केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश कुमार चौधरी यांचा वैद्यकीय औषधे विकण्यासाठी कुबेर फर्मान सर्जिकल नावाने सेक्टर २१, कामोठे येथे गाळे आहेत. त्यासाठी त्यांनी पाच मुले कामावर ठेवलेले आहेत. ते त्यांच्या गावी राजस्थान येथे गेले असताना नथुराम सोनाराम चौधरी हा ग्राहकांच्या मागणीप्रमाणे औषधे पोहोच करून त्यांच्याकडून धनादेशाद्वारे रोखीने पैसे घेऊन बँकेत जमा करत होता. सुरेश कुमार यांचा अपघात झाल्याने ते बरेच दिवस दुकानांमध्ये गेले नव्हते. त्यांनी दुकानातील जमा असलेला माल व बँक अकाउंटमध्ये जमा असलेली रक्कम व येणारी उधारी या सर्वांचा ताळमेळ लावण्याचा प्रयत्न केला असता तफावत आढळून आले. नोकर नथुराम चौधरी याने चोरून २८ ग्राहकांना १० ते १५ टक्के सवलतीने मालाची विक्री केली. याप्रकरणी नथुराम सोनाराम चौधरी (रा. जालोर, राजस्थान) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बोगस पावत्यांमधून १० कोटी लाटले

**नवी मुंबई :** केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विभागाने १० कोटी २६ लाख रुपयांचे बनावट इनपूट टॅक्स क्रेडिट्सचे रॅकेट उघडकीस आणले आहे. या प्रकरणी व्यापाऱ्यास अटक केली असून त्याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. लोखंड, अॅल्यूमिनियम, तांबे व इतर धातूच्या भंगाराचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्याने ६० कोटीपेक्षा जास्त किमतीच्या बनावट पावत्या तयार केल्या होत्या. त्याच्या आधारे बनावट इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला होता. नवी मुंबई जीएसटी आयुक्तालयाच्या गैरव्यवहार प्रतिबंधक पथकाच्या अधिकाऱ्यांनी या कंपनीची चौकशी केली असता अस्तित्वात नसलेल्या कंपन्यांच्या नावाने बनावट इनपूट क्रेडिट्स मिळविल्याचे निदर्शनास आले. तब्बल १० कोटी २६ लाखांचे इनपूट टॅक्स क्रेडिट मिळवून शासनाची फसवणूक केली. संबंधितास ८ फेब्रुवारीला अटक करण्यात आली, असे नवी मुंबईचे आयुक्त प्रभात कुमार यांनी सांगितले.

# 'झुक झुक गाडी'चा उपक्रम पनवेलसह रायगडात फोल

## रात्रीच्या 'दादर-सावंतवाडी'वरील माहिती पाहणार कोण?

**पनवेल : प्रतिनिधी**

मध्य रात्रीच्या अंधारात पनवेलकरांना तर साखर झोपेत दक्षिण रायगडकरांना दोन वर्षांत राज्य सरकारने केलेल्या अनेक विविध विकासकामांची माहिती व राज्य शासनाच्या उपक्रमांची माहिती तुतारी एक्स्प्रेसच्या (दादर-सावंतवाडी) माध्यमातून दिली जाणार आहे, मात्र साखर झोपेत आली आली झुक झुक गाडी...! स्वप्नांच्या दुनियेत स्टेशनवर जाऊ या, जाऊ या, सरकारच्या कामांची माहीती घेऊ या, घेऊ या असे म्हणायची वेळ रायगडमधील जनतेवर सरकारी अधिकाऱ्यांमुळे आली आहे.

राज्यात प्रथमच रेल्वेच्या माध्यमातून राज्य सरकार 'आपला महाराष्ट्र आपले सरकार' या मोहिमेतून हा उपक्रम राबवीत आहे. यामध्ये राज्यात करण्यात आलेल्या विविध कामांचा उल्लेख रेल्वेच्या डब्यांवर करण्यात आला आहे. दोन वर्षांत राज्यात राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी रेल्वेच्या डब्यांचा वापर करण्यात येत आहे. यावर्षी प्रथमच लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांचा वापर करण्यात आला आहे.

दादर-सावंतवाडी एक्स्प्रेस, मुंबई-लातूर एक्स्प्रेस, मुंबई-नांदेड एक्स्प्रेस, मिरज मार्गे धावणारी कोल्हापूर-मुंबई कोयना व कोल्हापूर-गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्स्प्रेसचा समावेश आहे. राज्य शासनाच्या उपक्रमांची माहिती थेट जनतेपर्यंत पोहोचावी, यासाठी १ फेब्रुवारी ते १ मार्च २०२२ दरम्यान एक महिना हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.




'आपला महाराष्ट्र, आपले सरकार' ही टॅग लाईन घेऊन विविध लोकापयोगी योजनांचा अतिशय समर्पक संदेश रेल्वे गाड्यांच्या डब्यांवर अंकित करण्यात आला आहे. शेती, क्रीडा, सामाजिक न्याय, आरोग्य, मोफत सातबारा, ई-पीक पाहणी, यासह विविध योजनांचा येत समावेश आहे. राज्य सरकारकडून दादर-सावंतवाडी (तुतारी एक्स्प्रेस) ह्या गाडीची निवड करण्यात आली आहे. तुतारी एक्स्प्रेस ही रात्री १.१० वाजता पनवेल, ३.१८ वाजता माणगाव, ३.३५ वाजता वीर रेल्वेस्थानकावर येते, म्हणजेच पनवेलला मध्यरात्री तर माणगाव व वीर रेल्वेस्थानकावर पहाटे साखर झोपेत असताना येते.

या वेळी माणगाव व वीर या स्थानकावर किंवा गाडीच्या मार्गाच्या आजूबाजूला कोणी ही नसते. त्यामुळे ही माहिती नागरिकांपर्यंत कशी पोहचणार याचा विचार या गाडीची निवड करणार्या अधिकाऱ्यांनी केलेला दिसत नाही. या गाडी ऐवजी दिवा-सावंतवाडी गाडीची निवड केली असती तर ही गाडी दोन्ही वेळा (येता-जाता) दिवसा उजेडी जाते. या गाडीला जास्त थांबे असल्याने जास्तीत जास्त लोकांपर्यंत माहिती पोहचवण्याचा उद्देश सफल झाला असता.

## सीकेटी विद्यालयात विशेष पालक सभा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमातील विद्यालयात शनिवारी (दि. १२) इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष पालक सभा आयोजित केली होती.



या सभेत २०२१-२२ मध्ये इयत्ता नववीत शिकत असलेले हे विद्यार्थी मार्च २०२३मध्ये दहावी बोर्ड परिक्षेस सामोरे जातील, परंतु गेली दोन वर्षे कोरोना काळात हे विद्यार्थी प्रत्यक्ष शिक्षण फार कमी काळ घेऊ शकले. सर्व भर ऑनलाईन शिक्षणावरच दिला गेला होता. या परिस्थितीचा विचार करता पुढील वर्षातील अभ्यासाचे नियोजन विद्यार्थ्यांनी कसे करावे, अभ्यासक्रमातील कोणत्या कठीण भागांवर लक्ष केंद्रित करून पाया मजबुत करावा, सर्व विषयांचा अभ्यास करताना वेळेचे व्यवस्थापन कसे करावे या अनेक बाबींवर या सभेमधे उहापोह करण्यात आला. विषय शिक्षकांनी पालक आणि विद्यार्थ्यांना संयुक्त मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी या वेळी पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पाल्याची विद्यालयातील उपस्थिती अत्यंत आवश्यक आहे तसेच वर्षभरातील सराव परिक्षा, प्रश्नसंच सोडवणे हे अत्यंत गरजेचे असून या परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची तयारी शाळा करून घेत असते.


विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला आमचे शिक्षक सदैव तत्पर असतात.

या सभेला साधारण १०० पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या पालकसभेस आर्याप्रहर वृत्तपत्राचे संपादन सुधीर पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

## सामाजिक संस्थांनी मानले नगरसेवक राजू सोनी यांचे आभार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक राजू सोनी यांनी केलेल्या विकासकामांचे कौतुक शहरातील विविध सामाजिक संस्था, मंडळे हे फलक लावून करीत आहेत.




शहरातील आदर्श हॉटेल ते लाईन आळी आणि विनम्र हॉटेल पर्यंतच्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती. यासंदर्भातची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना कळताच त्यांनी तत्परतेने या ठिकाणी रस्त्याची कामे करून घेतल्याने त्यांचे कौतुक लाईन आळी येथील शिवशक्ती मित्र मंडळाने जाहीर फलक लावून त्यांचे आभार मानले आहेत.



## हळदीकुंकू समारंभाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या वतीने उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

नगरसेवक विक्रांत पाटील हे नेहमीच प्रभाग १८ मध्ये नाविन्यपूर्ण आणि समाजउपयोगी उपक्रम राबवत असतात. माता भगिनींशी असलेला संवाद वाढवा आणि गप्पागोष्टींच्या माध्यमातून त्यांना काही क्षण विरंगुळ्याचे मिळावे या हेतूने नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या वतीने हळदीकुंकू संमारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महिला वर्गाने उत्तम प्रतिसाद दिला.

या वेळी वाण म्हणून भेटवस्तू माता भगिनींना देण्यात आले. मनोरंजन हेतूने संगीत खुर्ची, उखाणे स्पर्धा आणि इतर खेळही घेण्यात आले. माता भगिनींनी या खेळांमध्ये सहभाग घेऊन मनोसोक्त आनंद लुटला. कोरोना काळातल्या निर्बंधांमुळे महिलांना एकत्रित जमणे शक्य होत नव्हते, पण नगरसेवक विक्रांत पाटील यांनी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करून आम्हाला बऱ्याच दिवसांनी एकत्र येण्यास आणि खेळांच्या माध्यमातून विरंगुळ्याचे क्षण लुटण्यास माध्यम दिले त्याबद्दल सर्व महिला वर्गांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांना धन्यवाद दिले.

या वेळी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्यावतीने त्यांच्या पत्नी मोहिनी विक्रांत पाटील यांनी आलेल्या सर्व माता भगिनींचे स्वागत केले. प्रभागातील सर्व माता भगिनींना हळदीकुंकू समारंभात भाग घेता यावा यासाठी विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## उद्यानातील समस्या सोडवा -पांडुरंग आमले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा सेक्टर ७ मधील सीताराम मास्तर उद्यानातील समस्या सोडविण्याची मागणी भाजपचे युवा नेते पांडुरंग आमले यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे निवेदनातून केली आहे.



सानपाडा सेक्टर ७ मध्ये महापालिकेचे सिताराम मास्तर हे विस्तीर्ण उद्यान आहे. या उद्यानात महापालिका प्रशासनाने बसविलेले ओपन जीममधील साहित्याची दुरावस्था झालेली आहे. साहित्य नादुरूस्त झाली आहेत. या साहित्याची लवकरात लवकर दुरूस्त झाली तर स्थानिक रहीवाशांना ओपन जीमच खऱ्या अर्थाने वापर करणे शक्य होईल. या मैदानात एका ठिकाणी असलेल्या गवतावर स्थानिक परिसरातील महिला सकाळच्या वेळी योगा करण्यात येत असतात, परंतु सकाळी उद्यानातील गवतावर मोठ्या प्रमाणावर पाणी असल्याने महिलांना योगा करणे शक्य होत नाही. त्यांनी योगासाठी आणलेले मॅट भिजत असल्याने योगा करता येत नाही. महापालिका प्रशासनाने त्या गवतावर सकाळी १० नंतर अथवा दुपारनंतर पाणी मारल्यास सकाळच्या वेळी परिसरातील महिलांना या ठिकाणी योगा करणे शक्य होईल, असे आमले यांनी निवेदनात नमुद केले आहे.

## 'अवकाळी'मुळे कांदा उत्पादनावर परिणाम

■ बाजारात ओला व ५० टक्के खराब माल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एपीएमसीच्या कांदा बाजारात सध्या नवीन कांद्याची आवक वाढली असून दिवसाला १०० गाड्या कांदा येत आहे, मात्र यातील ५० टक्के कांदा हा खराब आहे. अवकाळी पावसामुळे या वर्षी कांदा उत्पादनावर हा परिणाम झाल्याचे दिसत असून कांदा दर चढेच राहतील अशी शक्यताही व्यापारी व्यक्त करीत आहेत.



घाऊक बाजारात कांदा दर प्रतिकिलो २० ते ३० रुपयांवर स्थिर आहेत. नवीन कांदा हंगामात राज्यात अवकाळी पाऊस पडल्याने तोडणीला आलेले उत्पादन खराब झाले आहे. कांदा पिकाला गरजेपेक्षा अधिक पाणी मिळाल्याने मालाच्या दर्जावर परिणाम झाला आहे.

बाजारात दररोज १०० गाडी कांदा आवक होत आहे. मात्र यामध्ये आतून ओलसर असलेला कांदा सर्वाधिक आहे. हा कांदा केवळ एक-दोन दिवसच टिकत आहे. त्यामुळे दर्जदार मालाला मागणी असताना पुरवठा करता येत नाही.

हवामान बदलाचा कांदा पिकाला मोठा फटका बसला आहे.

> **बाजारात मोठ्या प्रमाणावर नवीन कांद्याची आवक होत आहे. मात्र अवकाळी पावसाने उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे बाजारात ओलसर कांदा अधिक प्रमाणात येत आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामात कांदा दर चढेच राहणार आहेत.**
> **-मनोहर तोतलानी, व्यापारी, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती**

त्यामुळे छोट्या शेतकऱ्यांनी तर कांदा काढणीऐवजी पिकात जनावरे सोडण्यास पसंती दिली आहे. साधारण एक एकर शेतात कांद्याच्या दोनशे ते अडीचशे गोणी उत्पादन होत असते. या हंगामात फक्त २० ते ३० गोणी उत्पादन मिळाले आहे. त्यातही फक्त दहा गोणी दर्जेदार कांदा आहे. त्यामुळे बाजारात कांदा पाठवणे शेतकऱ्यांना परवडत नाही, असे आंबेगाव तालुक्यातील वडगाव काशिंबे येथील शेतकरी राजू खिरड यांनी सांगितले.


दरवर्षी फेब्रुवारी ते मार्च दरम्यान नवीन कांदा आवक वाढल्यानंर कांदा दरात घसरण होते. दरवर्षी घाऊक बाजारात या काळात प्रतिकिलो कांद्याचे दर १० रुपयांच्या खाली असतात. मात्र यंदा प्रतिकिलोचे दर २० ते ३० रुपयांवर स्थिर आहेत.

## उरणमध्ये गोल्डन शुगर कलिंगड दाखल

**उरण : वार्ताहर**

उन्हाचा तडाखा वाढण्यापूर्वी उरण बाजारात रोह्याचे गोल्डन शुगर गारेगार कलिंगड दाखल झाले आहेत. हे कलिंगड खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत.

कलिंगडाच्या हंगामाची सुरुवात जानेवारी महिन्यात होते. जून महिन्यापर्यंत हा हंगाम सुरू असतो. यंदा अवकाळी पावसामुळे यंदा कलिंगडाचा हंगाम काहीसा लांबणीवर पडला. त्यामुळे पुढील आठवड्यात कलिंगडाची आवक आणखी वाढेल. उन्हाळ्यात मागणी वाढत आहे. कलिंगडच्या आकारावरून किंमत ठरविली जाते. लहानांत लहान १०० रुपये तर मोठे आकाराचे २१० रुपये अश्या भावाने आम्ही विकतो, असे रोह्या तालुक्यातील तळाघर येथील कलिंगड विक्रेते निशिकांत मधुकर गुरव यांनी सांगितले.



> **उन्हाची काहिली वाढल्यावर कलिंगड आम्ही विकत घेतो. गोल्डन शुगर व शुगर किंग कलिंगड बाहेरून काळेभोर आणि गार लाल असणारी गोल्डन शुगर कलिंगडे नागरिकांना पसंतीत उतरतात.**
> **-मधुकर पेडणेकर, ग्राहक, उरण**

गडद हिरव्या रंगाची कलिंगड शुगर किंग, गोल्डन शुगर या नावाने ओळखले जातात. फ्रुट सलाड आणि ज्युस बनविण्यासाठी हि कलिंगडे मोठ्या प्रमाणात वापरली जातात. जसजसे तापमान वाढते तसतशी कलिंगडांना मागणी वाढत असल्याचे कलिंगड विक्रेती मुक्ता शशिकांत गुरव यांनी सांगितले.

## नवी मुंबईत माझी गल्ली स्वच्छ गल्ली स्पर्धा; विजेत्यांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

शेल्टर असोसिएट्स संस्थेच्या माध्यमातून नवी मुंबई मधील तुर्भे विभाग अंतर्गत 'माझी गल्ली स्वच्छ गल्ली' ही स्पर्धा इंदिरा नगर, हनुमान नगर, गणपती पाडा या वस्त्यांमध्ये घेण्यात आली.

संस्थेने गोळा केलेल्या जीआयएस तंत्रज्ञानाच्या मदतीने २५० घरांचे पॉकेट बनवण्यात आले. २० स्वयंसेवकांना निवडून या २५० घरांची जबाबदारी देण्यात आली. विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले. वस्तीमधील स्वयंसेवकांच्या माध्यमातून ६,००० हून अधिक रहिवाशांना स्वच्छ्ता व आरोग्य या संदर्भात माहिती देण्यात आलेली आहे. वस्तीमधील नागरिकांचा सहभागातून गटार स्वच्छता, रस्ते सफाई ही कामे करण्यात आली. कचरा वर्गीकरण करून तो घेऊन जाण्याची व्यवस्था चांगली करण्यात आली. वेगवेगळ्या परीक्षकांनी या स्पर्धेची विविध निकष घेऊन पाहणी केली आणि मार्क्स दिले त्यानंतर विजेते घोषित करण्यात आले.




तीन वस्त्यांमध्ये माझी गल्ली स्वच्छ गल्ली स्पर्धा घेतली गेली. या वेळी समाज मंदिर येथे हनुमान नगर येथील २, इंदिरा नगर येथील २ आणि गणपती पाडा येथील १ असे पॉकेट विजेते घोषित करण्यात आले. या सर्व पॉकेटमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवकांना या वेळी नवी मुंबई महानगर पालिका उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आणि विजेत्या पॉकेटना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

शेल्टर असोसिएट्स मार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन सिमा गावडे, रूपरेषा प्रतीक बनसोडे, आभार प्रदर्शन अमोल गाडे यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक धनश्री गुरव आणि इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

नवी मुंबई महानगर पालिकेकडून मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनवणे, स्वच्छता अधिकारी संजय बदे, स्वच्छता निरीक्षक मेश्राम, दुर्वे कर, खरे, पाटील आणि इतर कर्मचारी नागरिक उपस्थित होते.

अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

# सरकारच्या आणि रिझर्व्ह बँकेच्या धाडसामुळे अर्थव्यवस्थेला गती!

**महसूल वाढीला पुरेसा वेग आला नसताना सरकारने तूट मान्य करून भांडवली खर्चात ३५ टक्के वाढ करणे आणि महागाई वाढत असताना रिझर्व्ह बँकेने बँक दरांत वाढ न करणे, ही धाडसी पाऊले आहेत. कोरोना संकटानंतर वेगाने वाढत असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला त्यातून गती मिळाली तर ती देशाला हवीच आहे.**







अर्थव्यवस्था हा प्रामुख्याने आकडेवारीने मांडण्याचा विषय असतानाही त्याच्याविषयी जी मतमतांतरे व्यक्त होतात, ती मात्र एकदम परस्पर विरोधी असू शकतात, याचा अनुभव आपण सततच घेत असतो. त्यामुळेच जेव्हा देशाचा अर्थसंकल्प सादर केला जातो, त्याची चर्चाही तशीच होते. अगदी त्यातील राजकीय भाग बाजूला ठेवला तरी अर्थतज्ञही अशीच दोन टोकाची मांडणी करताना दिसतात. खरे म्हणजे किमान आर्थिक विषय तरी वस्तुनिष्ठपणे मांडला गेला पाहिजे, पण तसे कधी होताना दिसत नाही. ही मांडणी जेव्हा सर्वसामान्य नागरिकांसमोर येते, तेव्हा त्याचाही गोंधळ होतो. एवढी मतमतांतरे पाहून तो विषय फार अवघड आहे, असा समज तो करून घेतो.

अशा पार्श्वभूमीवर नुकतेच येऊन गेलेले बजेट आणि गेल्या गुरुवारी रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेले पतधोरण, अशा दोन्ही घटनांकडे पाहिले तर काय दिसते? या दोन्ही घटनांच्या निमित्ताने देशासमोर आलेली आकडेवारी आपल्याला काय सांगते? आपल्या देशाची अर्थव्यवस्था कोरोना संकटानंतर सुधारते आहे की बिघडते आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी या दोन्ही घटनांमधून जी आकडेवारी समोर आली आहे, तिच्या अधिक खोलात जाण्याची गरज आहे. तसा प्रयत्न आपण काही आकडेवारीच्या मदतीने करून पाहूयात.

**अमेरिका पुढे–जग मागे**

कोरोनामुळे सर्व जगाची अर्थव्यवस्था संथ झाली आहे, हे आधी मान्य केले पाहिजे, म्हणूनच अमेरिकेसारख्या आर्थिक महासत्ता असलेल्या देशाने पारंपारिक अर्थशास्त्राला बाजूला ठेवून अर्थव्यवस्थेमध्ये प्रचंड डॉलर्स ओतले. पैसा स्वस्तात म्हणजे अतिशय कमी व्याजदरात उपलब्ध केला. भारतासह सर्व जगाने तोच कित्ता गिरविला आणि तोच एक मार्ग जगासमोर होता. त्याचा परिणाम असा झाला की व्यवस्थेमध्ये मुबलक पैसा आला, पण त्या तुलनेत उत्पादन होत नसल्याने महागाई वाढली. अमेरिका आणि भारतासह जगभर महागाईची आज जी चर्चा सुरू आहे, तिचे कारण हे आहे. अर्थात, पैशाचा हा पुरवठा मार्चपासून टप्प्याटप्प्याने कमी करण्याचा निर्णय अमेरिकेने जाहीरही केला आहे. त्यामुळे यापुढे इतर देशही तोच मार्ग अनुसरतील, असे मानले जाऊ लागले आहे. असे असताना भारताच्या रिझर्व्ह बँकेने मात्र बँक दर न वाढविता तसेच ठेवले आहेत. म्हणजे भारतात अजून काही काळ कमी व्याजदरात पैसे उपलब्ध करून दिला जाणार आहे.

**महागाई सहन करून विकास**

आता मुद्दा असा उपस्थित होतो की, भारतीय रिझर्व्ह बँक या वेळी बँक दर वाढविणार असे मानले जात असताना तिने असे का केले नाही? याचे एक उत्तर असे सांगितले गेले की भारतातील महागाई काही अमेरिकेत वाढली तेवढी वाढलेली नाही. ती काही काळ सहन करण्यासारखी आहे, पण बँकेचे व्याजदर जर कमीच ठेवले तर त्यातून उत्पादन वाढीला तसेच निर्मितीला वेग येईल ज्यातून विकासाचा वेग कायम ठेवता येईल. भारताचा जीडीपी चालू आर्थिक वर्षात ९.२ टक्के राहील, असा अंदाज अर्थसंकल्पात देण्यात आला असून तो जगात सर्वाधिक राहील, असेही म्हटले आहे. भारत सरकारला आणि रिझर्व्ह बँकेला देशाच्या अर्थव्यवस्थेविषयी हा आत्मविश्वास आहे, ही अतिशय चांगली बाब आहे.

**महसूलवाढीची सरकारला खात्री**

भारताची अर्थव्यवस्था आजच्या तारखेला २.३२ लाख कोटी रुपयांची म्हणजे जगात सहाव्या क्रमांकाची आहे. याचा दुसरा अर्थ असा की गेल्या काही वर्षांत ती वाढते आहे, कारण सात वर्षांपूर्वी ती १.१ लाख कोटी रुपयांची म्हणजे जगात दहाव्या क्रमांकाची होती. अर्थव्यवस्थेत वाढ होत असेल तर सरकारी खर्च वाढविणे आणि चलनवाढ काही काळ सहन करण्याचा निर्णय सरकारने जाणीवपूर्वक घेतलेला दिसतो. कारण पायाभूत सुविधांवर सरकारी खर्च वाढविला नाहीतर नवी कामे कशी सुरू होणार आणि ती सुरू नाही झाली तर रोजगार कसा वाढणार? कोरोनाचे संकट विसरून खासगी गुंतवणुकीला चालना मिळत नाही तोपर्यंत तो भार सरकारनेच उचलणे अपेक्षित आहे. तसे करण्यास सध्याची आर्थिक स्थिती सरकारला साथ देते आहे. यातून काही जोखीम निर्माण होत असणार, हे ओघाने आलेच. पण विविध क्षेत्रांसाठी केलेल्या तरतुदी लक्षात घेता महसूलवाढ होणार याची सरकारला खात्री दिसते आहे.

महसूल सचिव तरुण गोगई यांनी अर्थसंकल्पानंतर विविध व्यासपीठांवर दिलेली माहिती या संदर्भाने महत्त्वाची ठरते. जीडीपीच्या ६.९ टक्के तूट ही त्यांना चिंताजनक वाटत नाही. उलट २०२५ – २६पर्यंत ती ४.५ टक्क्यांवर आणता येईल, असे ते म्हणतात. कोरोनाच्या संकटानंतरही देशाच्या महसुलात जी वाढ पाहायला मिळते आहे ती वाढ सचिवांना हा आत्मविश्वास देते आहे. जीएसटी संकलन दर महिन्याला १.२५ लाख कोटींवर गेले (जे गेले सहा महिने गेलेच आहे.) आणि इन्कमटॅक्स तसेच कंपनी करात अशीच वाढ होत गेल्यास सरकारची महसुलाची बाजू पक्की होत जाईल. जीडीपीच्या तुलनेत करांचा वाटा भारतात नेहमीच कमी राहिला आहे, तो जर असाच वाढत राहिला तर सचिवांचा आत्मविश्वास अनाठायी म्हणता येणार नाही. या अर्थसंकल्पात भांडवली खर्चात तब्बल ३५ टक्के वाढ करण्यात आली आहे. याचाच अर्थ असा की सरकारने तूट मान्य करून हे धाडस करण्याचा निर्णय घेतला आहे.

**स्वागतार्ह धाडस**

कोरोना संकटाचा आर्थिक फटका सर्वच देशांना बसला आहे. कमी उत्पन्न असलेले किंवा असंघटीत वर्गाला त्याचा अधिक त्रास झाला आहे, पण आता त्यातून बाहेर पडून विकासाला गती देण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. पारंपरिक अर्थशास्त्राला धरून बसायचे तर व्याज दर दोन वर्षांनंतर कायम ठेवणे आणि तुट मान्य करून विकासाला प्राधान्य देण्याचे धाडस करता येणार नाही. आयात निर्यात व्यापारातील भारताची तुट कमी होत असल्याची अलीकडील आकडेवारी, परकीय चलनाचा विक्रमी साठा, भांडवली बाजारात उतरत असलेल्या कंपन्यांना गुंतवणूकदारांचा मिळणारा उत्तम प्रतिसाद, घरांच्या आणि मोटारींच्या विक्रीचे वाढत चाललेले आकडे, शेती उत्पादन आणि निर्यातीत होत असलेली वाढ आणि अशी काही आकडेवारी सांगते की भारतातील आर्थिक उलाढाल आता चांगलीच वाढली आहे. नागरिकांना आपल्या देशाच्या अर्थ व्यवस्थेवर असलेला विश्वासच यातून दिसून येतो. त्यामुळेच पारंपरिक अर्थशास्त्रात वर्ज मानली जाणारी पाऊले सरकार आणि रिझर्व्ह बँक उचलताना दिसते आहे. अशा पावलांमुळे जगातील आजच्या अनिश्चित वातावरणात देशाला आर्थिक स्थैर्य मिळणार असेल तर अशा धाडसाचे स्वागतच केले पाहिजे.

# बोनस शेअर आणि शेअरवरील लाभांश

**शेअर बाजारात गुंतवणूक केल्यावर मिळणारे बोनस शेअर्स आणि शेअर्सवर मिळणारा लाभांश म्हणजे नेमके काय याविषयी अनेकदा चुकीच्या कल्पना असतात. अशा प्रकारच्या गुंतवणुकीवर मिळणारा परतावा म्हणून त्याकडे पाहिले जाते, पण खरोखर त्यातून किती परतावा मिळतो याचा विचार करण्यासाठी त्याविषयीची स्पष्टता असणे आवश्यक आहे.**



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com







मागील आठवड्यात बीएसईनं २:१ बोनस शेअर्सची घोषणा केली, म्हणजेच १ शेअरवर २ बोनस शेअर्स. बोनस म्हटलं की सर्वसामान्य नोकरवर्गास दिवाळी वाटते, दोन्ही अर्थानं. कामगारांना आधी दर आठवड्याला पगार (वेजेस) मिळायचा. वर्षातून ५२ आठवडे, परंतु मासिक पगार ही पद्धत चालू झाल्यावर १२ महिन्यांचा म्हणजे ४८ आठवड्यांचा पगार मिळू लागला, म्हणजेच चार आठवड्यांची आमदनी कमी मिळू लागली. त्यामुळं कामगारांनी त्यांच्या चार आठवड्याच्या हक्काचा पगारासाठी तगादा लावला आणि त्या चार आठवड्याच्या आमदनीस बोनस म्हटलं जाऊ लागलं. नंतर समन्वयानं त्यात तरतूद झाली वगैरे वगैरे..

**बोनस शेअर्स :** समभागधारकांच्या मालकीच्या शेअर्सच्या संख्येच्या आधारे सध्याच्या भागधारकांना कोणत्याही अतिरिक्त खर्चाविना अतिरिक्त शेअर्स दिले जातात. ही कंपनीची जमा केलेली कमाई असते जी लाभांश स्वरूपात दिली न जाता समभागांमध्ये रुपांतरित केली जाते. वर नमूद केल्याप्रमाणं बीएसईनं २:१ या प्रमाणात बोनस शेअर जाहीर केलेला आहे. याचा अर्थ दोन शेअर बोनस मिळणार जर तुमच्याकडं आधी त्या कंपनीचा एक शेअर असेल तर अनेक जणांची इथं गल्लत होऊ शकते, म्हणजेच या उदाहरणात बोनस मिळाल्यानंतर एकूण तीन शेअर्स होतील.

कंपनीचा नफा वाढल्यास कंपनीचे रिझर्व्हसदेखील वाढत असतात. कंपनी हे रिझर्व्हज स्वतःकडं ठेवते ज्यातून लाभांश दिला जाऊ शकतो किंवा कंपनी स्वतःचा विस्तार करण्यास या रिझर्व्ह पैशाचा वापर करू शकते. कंपनीचे रिझर्व्ह जरी जास्त असतील तरी कंपनी लाभांश वितरण न करण्यामागं विचार पद्धती अशी असू शकते की, जर कंपनीनं हे रिझर्व्ह लाभांशाच्या स्वरूपात वितरीत केले तर लाभार्थी ते किती प्रमाणात वाढवू शकतील? फारतर ७–८ टक्क्यांनी! त्यापेक्षा कंपनी असा विचार करू शकते की जर तेच पैसे लाभांश न वाटता त्यावर कंपनी विस्तार करून जास्त नफा कमावू शकते ज्याचं पर्यावसान शेअरचा भाव वाढण्यात होऊ शकतं.

आता कंपनी बोनस का देते? याची प्रामुख्यानं दोन कारणं आहेत, ते म्हणजे किरकोळ गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी व त्याद्वारे इक्विटी बेस सहभागिता वाढवण्यासाठी, ज्याद्वारे व्यवहारांमधील तरलता वाढते आणि दुसरं कारण म्हणजे जेव्हा कंपनीच्या शेअरचा भाव खूप जास्त असतो तेव्हा नवीन किरकोळ गुंतवणूकदारांना त्या विशिष्ट कंपनीचे शेअर्स खरेदी करणे कठीण होते (उदा. एमआरएफ, हनीवेल, पेज इंडस्ट्रीज, ३एम इंडिया, आयशर मोटर्स, नेस्ले, बॉश, इ). शेअर्सची संख्या वाढल्यास प्रति शेअर किंमत कमी होते. बोनस समभाग घोषित केले तरीही एकूण भांडवल समानच असते. गुंतवणूकदारांना बोनस शेअर्स देण्यासाठी कंपनी आपल्या नफ्यातील काही रक्कम राखीव ठेवते. जेव्हा ही रक्कम मोठी होते तेव्हा कंपनी हे रिझर्व्हज भाग भांडवलाच्या खात्यात हस्तांतरित करते व ज्यामधून कंपनी बोनस समभाग जारी करते. जारी केलेल्या समभागांची संख्या वाढवून तिचं एम्प्लॉयीड कॅपिटल वाढवू शकते. वाढलेला नफा कंपनी लाभांशाद्वारे आपल्या भागधारकांना वाटू शकते अथवा बोनस शेअर्स देऊन. सध्या एका वर्षात मिळणारं लाभांश उत्पन्न जर ५००० रुपयांच्या वर असेल तर त्यावर कर आकारला जातो त्याउलट मिळालेल्या बोनस शेअर्सवर कोणताही कर नसल्यानं हा पर्याय जास्त सोयीस्कर वाटू शकतो, मात्र मिळालेले शेअर्स नफ्यात विकल्यास त्यावरदेखील भांडवली कर आकारला जातो, अर्थातच नफ्याच्या प्रमाणात तसेच मिळालेल्या बोनस शेअर्समुळं तूर्त कोणताच फायदा भागधारकास मिळत नाही मात्र लाभांश वितरीत न करता कंपनी मात्र बचत करते. त्यामुळं अनेकांचा प्रश्न पडतो की बोनस दिल्यानं कंपनीचं नुकसान होतं का? नाही. सहसा बोनस शेअर मिळाल्यानंतर शेअर्सची किंमत बोनस शेअर्सच्या प्रमाणानं समायोजित होते. म्हणजे १:१ बोनस असल्यास भाव निम्मा होतो.

**लाभांश :** आपण सर्वच जाणतो की, पारंपरिक गुंतवणुकीच्या माध्यमात व्याज हेच एक परताव्याचा मार्ग असतो (ठेवींवरील व्याज अथवा मुदतपूर्तीच्या वेळी व्याजासकट मिळणारी निश्चित रक्कम) परंतु शेअर्सच्या माध्यमातून केलेल्या गुंतवणुकीवर कोणताच निश्चित परतावा नसतो, परंतु तरीही मागील ४० वर्षांचा इतिहास पाहता सर्वांत जास्त परतावा याच माध्यमातून मिळालेला दिसतो. शेअर बाजारातील गुंतवणुकीमधून दोन प्रकारचा फायदा मिळवता येऊ शकतो. एक म्हणजे भांडवल वृद्धी व दुसरा म्हणजे कंपनीकडून वेळोवेळी मिळणारा लाभांश. जेव्हा एखादी कंपनी नफा किंवा अतिरिक्त उत्पन्न मिळविते, तेव्हा त्या उत्पन्नातील काही भाग कंपनी भागधारकांना लाभांश म्हणून वाटते. इतिहासात, डच ईस्ट इंडिया कंपनीची नियमीत लाभांश देणारी पहिली कंपनी म्हणून नोंद आढळते. कंपनीचा लाभांश त्याच्या संचालक मंडळाद्वारे निश्चित केला जातो आणि त्यास भागधारकांच्या मंजुरीची आवश्यकता असते. थोडक्यात, लाभांश म्हणजे कंपनीच्या समभागधारकांना नफ्याचं वितरण. कर्जदारांना पैसे परतफेड अथवा व्याज दिल्यानंतर एखादी कंपनी आपल्या भागधारकांना लाभांश देण्यासाठी नफ्यातील काही भाग किंवा अवशिष्ट नफा वापरू शकते. तथापि, जेव्हा कंपन्यांना रोखीची कमतरता येते किंवा जेव्हा कंपनीस पुनर्गुंतवणूकीसाठी अथवा व्यवसायवृद्धीसाठी रोख रकमेची आवश्यकता असते तेव्हा कंपनी लाभांश देणं टाळू शकते. त्यामुळं कंपनीला लाभांश देणे बंधनकारक नाही, परंतु गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी किंवा गुंतवणूकदारांच्या मनात आपली प्रतिमा चांगली राखण्यासाठी वा संबंधीत क्षेत्रात आपला दबदबा राखण्यासाठी कंपनी लाभांश देत असते. अनेक लोक शेअर बाजारामधील गुंतवणुकीमधून एक ठराविक उत्पन्नाचा स्रोत म्हणूनदेखील या उत्पन्नाकडं पाहतात, परंतु या वर्षापासून लाभांश हा करमुक्त नाहीय हेदेखील वाचकांनी लक्षात घ्यावं. अनेक कंपन्या अंतरीम व अंतिम अशा दोन्ही प्रकारे लाभांश वाटतात तर काही कंपन्या अजिबात लाभांश देत नाहीत तर तो पैसा व्यवसायामध्ये पुनर्गुंतवणुकसाठी वापरतात.

**डिव्हिडंड यील्ड महत्त्वाचे**

एक प्रमुख गोष्ट म्हणजे, लाभांश हा कंपनीच्या दर्शनी मूल्यावर म्हणजेच टक्केवारीवर दिला जातो किंवा प्रति शेअरदेखील जाहीर केला जातो. म्हणजेच अनेक वेळा आपण पाहतो की एखादी कंपनी ४०० टक्के डिव्हिडंड जाहीर करते. दिसताना हा मोठा आकडा भासतो, परंतु त्या कंपनीच्या शेअर्सचे दर्शनी मूल्य जर १ रुपया असेल तर त्यावर ४०० टक्के म्हणजे केवळ चार रुपयेच लाभांश मिळतो. त्यामुळं लाभांशाचा दर किती आहे यापेक्षा लाभांश उत्पन्न टक्केवारीमध्ये किती आहे हे तपासावं, त्यालाच डिव्हिडंड यील्ड म्हटलं जातं. वरील उदाहरणात जर कंपनीच्या शेअरचा भाव १० रुपये असेल तर डिव्हीडंड यील्ड हे ४० टक्के ठरेल व शेअरचा भाव जर ४०० रुपये असेल तर ते १ टक्काच ठरेल. साधारणपणे डिव्हीडंड यील्ड ८–१० टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर त्यास चांगला परतावा म्हणता येईल, परंतु यावरून ती कंपनी चांगली का वाईट हे ठरवणं अवघड असतं. अनेकवेळा लाभांश जाहीर होता होता शेअर्सरचा भाव आधीच खूप वाढलेला असतो त्यामुळं लाभांश मिळवण्यासाठी आपण किती वाढीनं शेअर खरेदी करतोय हे अभ्यासणंदेखील महत्त्वाचं आहे.

## एसआयपी माध्यमातून घेण्यासारखे शेअर्स

मागील महिन्यांत काही शेअर्सचे भाव घसरले आहेत तर काही शेअर्सचे भाव स्थिर आहेत. सूज्ञपणे पोर्टफोलिओ मंथन महत्त्वाचे आहे कारण शेअर्सबरोबर लग्न करू नये अशी म्हण आहे. जर शेअर्सची कामगिरी सुमार असेल तर लगेचच याचा अर्थ कंपनी वाईट आहे असा होत नाही, परंतु जर कंपनीचा व्यवसाय वाढ दर्शवत नसेल व नफा कमी होत असेल आणि त्यांची तिमाहीतील व वर्षभरातील कामगिरी सतत खालावत असेल तर अशा कंपन्यांची अधिक खोलवर तपासणी करण्याची गरज भासू शकते. त्यामुळं वर्षातून एकदा किंवा दोनदा आपल्या पोर्टफोलिओची तपासणी करणं खूप महत्त्वाचं आहे.

सध्याच्या स्थितीत मध्यम ते दीर्घ मुदतीसाठी खालील कंपन्या विचारात घेतल्या जाऊ शकतात. तरी स्वतः अभ्यास करून किंवा तुमच्या आर्थिक सल्लागाराच्या मार्गदर्शनाखाली आपले गुंतवणूक निर्णय घ्यावेत.

**पडत्या बाजारात एसआयपी माध्यमातून शेअर्स घेणे ही चांगली संकल्पना ठरू शकते.**

| | | |
|---|---|---|
| १. LTI | ८. टाटा पॉवर | १५. कॅन बँक/एसबीएन |
| २. LTTS | ९. टाटा मोटर ऊन्नठ | १६. GLAND फार्मा |
| ३. TATA ELXI | १०. TCS | १७. ग्रीन पॅनेल |
| ४. पिडिलाइट | ११. CDSL | १८. TATA कम्युनिकेशन्स |
| ५. बजाज फायनान्स | १२. पॉलीकॅब | १९. MTAR |
| ६. एशियन पेंट्स | १३. SRF | २०. प्रतिष्ठा |
| ७. रिलायन्स | १४. ICICI बँक | |

## अर्थसाक्षर स्पर्धा : ७
### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**
**उत्तर : *अ.)*** ब्लॉकचेन

**प्रश्न क्र. २. भारतात टपाल कार्यालयांची एकूण संख्या किती आहे?**
**उत्तर : *ब.)*** दीड लाख

**प्रश्न क्र. ३. अर्थसंकल्पात या प्रकारच्या ४०० रेल्वेगाड्या पुढील तीन वर्षांत सुरु करण्याची घोषणा करण्यात आली आहे.**
**उत्तर : *ड.)*** वंदे भारत

अर्थसाक्षर स्पर्धा ७ची बरोबर उत्तरे देणारे विजेते स्पर्धक सुमीत सुहास जोशी हे आहेत. स्पर्धकाला देण्यात येणारे गिफ्ट व्हाऊचर्स दुपारी २ ते ८ या वेळेत दैनिक राम प्रहरच्या कार्यालयातून घेऊन जावीत.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. लाईफ इन्शुरन्स ऑफ कार्पोरेशन (एलआयसी) चे मुख्यालय या शहरात आहे.**
***अ.)*** दिल्ली ***ब.)*** कलकत्ता ***क.)*** मुंबई ***ड.)*** चेन्नई

**२. अदानी उद्योग समूहातील कोणत्या कंपनीची अलीकडे शेअर बाजारात नोंद झाली?**
***अ.)*** अदानी इंटरप्रायझेस ***ब.)*** अदानी विल्मर ***क.)*** अदानी ग्रीन एनर्जी ***ड.)*** अदानी पॉवर

**३. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**
***अ.)*** टाटा एलक्सी ***ब.)*** हॅपीइस्ट माइंड ***क.)*** झेन्सर टेक्नोलॉजीस ***ड.)*** बीएएसएफ इंडिया




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# पेणमधील शेतकऱ्यांचा भूसंपादनाला विरोध

## एमआयडीसी प्रकल्प रद्द करा –आमदार रविशेठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील प्रस्तावित डोलवी औद्योगिक विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूसंपादन होणार आहे. जेएसडब्ल्यू कंपनीसाठी हे भूसंपादन होत असून त्याला येथील शेतकऱ्यांचा विरोध आहे. डोलवी एमआयडीसी प्रकल्प रद्द करावा; अन्यथा जेएसडब्ल्यू कंपनीचे गेट बंद केले जातील, असा इशारा माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी गडब येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या सभेत दिला.

पेण तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव गडब, डोलवी, वडखळ, बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोळवे, वावे, खारकारावी, काराव, खारमाचेला, खारेघाट, खारचीरबी, खारजांभेळा, खारढोबी या गावांतील २१०० एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. या भूसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून या संदर्भात गडब येथे शेतकऱ्यांची सभा आयोजित करण्यात आली होती .

या वेळी आमदार रविशेठ पाटील, आमदार जयंत पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, पं. स. सदस्य प्रदीप म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते अरुण शिवकर, वैशाली पाटील, प्रसाद भोईर, संजय डंगर, सरपंच अपर्णा कोठेकर, उपसरपंच दर्शना पाटील आदींसह शेतकरी उपस्थित होते.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची एकजूट महत्त्वाची आहे. पूर्वजांनी जपणूक केलेल्या जमिनी वारसा हक्काने राखायच्या आहेत. पुढच्या पिढीला वारसा हक्क मिळाला पाहिजे. त्यामुळे विधानसभेत हा प्रश्न मी मांडणार आहे. येथील एमआयडीसी प्रकल्प रद्द करा; नाही तर येथील शेतकरी राज्य सरकारला ऐकणार नाही, असेही ते म्हणाले.

राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई, उद्योग राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे रायगडचेच आहेत. जिल्ह्यातील दोन मंत्र्यांनी ही एमआयडीसी रद्द करावी, असे आवाहन आमदार जयंत पाटील यांनी केले. माजी आमदार धेर्यशिल पाटील, अरुण शिवकर, वैशाली पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले.

(छाया : अनिस मनियार)




एमआयडीसी प्रकल्प रद्द करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी असल्याचे या वेळी शेतकरी संघर्ष समिती संयोजक के. जी. म्हात्रे यांनी सांगितले.

## चौक येथील निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

**चौक : रामप्रहर वृत्त**

सरनोबत नेताजी पालकर यांच्या चौक या जन्मगावी नेताजी पालकर मंडळातर्फे यंदाही उंबरखिंड विजय दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार दिवंगत जनार्दन रामचंद्र भरतुक यांच्या स्मरणार्थ नरवीर तानाजी मालुसरे या विषयावर पत्रकार अनिल भरतूक यांनी निबंध स्पर्धा प्रायोजित केली होती.

स्पर्धेचे परीक्षण इतिहास अभ्यासक अशोक मोरे यांनी केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक शितलकुमार हसुराम म्हात्रे (पनवेल), द्वितीय विभागून निवास पांडुरंग थळे (रोहा) व देविदास गणपत म्हात्रे (पेण), तृतीय मिलिंद मधुकर जाधव (श्रीवर्धन), चतुर्थ विभागून अंकुश नथुराम जाधव (रोहा) व योगेश अशोक सोसे (खालापूर), पंचम गणेश गंगाराम मोकल (पनवेल) आणि उत्तेजनार्थ हिना छगनलाल कुमावत (चौक) व नियती सूर्यवंशी (खोपोली) यांनी पटकाविला आहे.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ मराठी राजभाषा दिनी अर्थात २७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता चौक येथे समाज प्रबोधनकार हरी महाराज माळी यांच्या अध्यक्षतेखाली आणि नरवीर तानाजी मालुसरे यांचे वंशज डॉ. शीतल शिवराज मालुसरे (महाड) व अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, असे नेताजी पालकर मंडळाचे संघटक यशवंत सकपाळ व स्पर्धा प्रमुख भूषण पिंगळे यांनी जाहीर केले आहे.

## कर्जतमध्ये प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**

प्लॅस्टिक पिशव्यांवर शासनाने बंदी घातली आहे. तरीही काही व्यापारी, नागरिक राजरोसपणे प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करतात. अशांवर कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी दंडात्मक कारवाई केली आहे.

कर्जत शहरात प्लॅस्टिकबंदी पाळली जात असून त्याची अंमलबजावणी करीत असताना नियम मोडणारे यांच्याविरुद्ध कडक कारवाई केली जात आहे. शुक्रवारी (दि. ११) आठवडा बाजार भरला होता. मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सर्व कर्मचारीवर्गाला बरोबर घेऊन सायंकाळी मुख्य बाजारपेठेत पाहणी केली आणि जे व्यापारी अजून ग्राहकांना प्लॅस्टिक पिशवी देतात अशा तीन व्यापाऱ्यांवर प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे दंडात्मक कारवाई केली.



(छाया : विजय मांडे)

मुख्याधिकारी डॉ. पाटील यांच्या मार्गदर्शखाली अरविंद नातू, जितेंद्र गोसावी, मनीष गायकवाड, लक्ष्मण माने, सुदाम म्हसे, सुनील लाड आदी कर्मचारीवर्ग कारवाईत सहभागी होते.

**पथक फिरते कार्यरत राहणार आहे. जे कोणी प्लॅस्टिक पिशवीचा वापर करतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.**

**–डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी, कर्जत नगर परिषद**

## रोह्यातील रोठ बुद्रुकमध्ये हळदीकुंकू उत्साहात

### ग्रामपंचायतीवर सत्ता वर्षपूर्तीनिमित्त उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील विकासाच्या आधारावर चालणाऱ्या रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीवर युतीची सत्ता येऊन एका वर्षाचा कालावधी पूर्ण झाला. त्यामुळे गुरुवारी (दि. १०) येथील महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच व सहकाऱ्यांनी वर्षभरात जिल्हा निधी, ग्रामनिधी व कारखान्यांमधील सीएसआरच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी विकासकामांचा धडाका लावला आहे. विकासकामांबरोबरच महिलांना प्राधान्य देऊन त्यांना स्वावलंबी होण्यासाठी केक बनवणे, कपडे शिलाई ट्रेनिंग, मसाले बनवणे यासह अनेक उपक्रम राबविण्यात आले. सुसज्ज अशी महिलांसाठी कार्यशाळा बांधून देण्यात आली. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या परिसरातील महिलांनी हळदीकुंकू समारंभात उस्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यांना हळदीकुंकू व सौभाग्याचे लेणे असलेले वाण देण्यात आले.

या वेळी सरपंच नितीन वारंगे, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, उपसरपंच वेदिका डाके, सदस्य वैभव भगत, अक्षता वारंगे, स्वप्नाली देवकर, ग्रामसेविका अलंका बामगुडे, भाजप महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, सुप्रिया वारंगे, अमृता डाके, हेमलता वारंगे, रोहिणी गोसावी, अमृता साळुंखे, दिपाली वारंगे, समृद्धी वारंगे, आदिती घाग, गीता डाके, संध्या मोरे, अश्विनी घाग, दीपिका डाके, प्रतीक्षा वारंगे यांच्यासह गावातील महिला उपस्थित होत्या.



(छाया : जितेंद्र जाधव)

## कर्करोगावर नियंत्रण शक्य



कॅन्सर किंवा कर्करोग हा अतिशय गंभीर स्वरुपाचा आजार आहे. हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकत नाही. कर्करोगाच्या काही प्रकारांवर अजूनही उपाय उपलब्ध नाहीत त्यावर संशोधन चालू आहे. कर्करोग नेमका कोणाला होऊ शकतो हे ठामपणे सांगता येत नाही, पण काही कारणे अशी आहेत. ज्यामुळे कॅन्सर होण्याचा धोका अधिक आहे. यातले पहिले कारण म्हणजे तंबाखू किंवा सिगारेट. वारंवार आपण कर्करोगाच्या जनजागृतीसाठी करण्यात आलेल्या जाहिराती पाहतो. यात या प्रमुख दोन कारणांमुळे कॅन्सर होण्याचा धोका अधिक असतो असे सांगतात, पण या व्यतिरिक्तही अनेक कारणे आहेत. जंक फुड, सतत चुकीचा आहार, बदलती जीवनशैली, प्रदूषण यासारख्या गोष्टीदेखील कर्करोगाला कारणीभूत आहेत. अलीकडे महिलांमधील स्तनांच्या कर्करोगात वाढ होऊ लागली आहे. प्रत्येकी एक लाख महिलांपैकी २५ महिलांना स्तनाच्या कर्करोगाची लागण होते आणि त्यापैकी १२.७ महिलांचा मृत्यू होतो.

आहाराच्या पद्धती, बदलती जीवनशैली, शहरीकरण, पाश्चिमात्यकरण, अनुवांशिकता, बाळाच्या जन्माच्या वेळी दूध न पाजणे या कारणांमुळे स्तनांचा कर्करोग होऊ शकतो. स्तनामध्ये गाठी आढळणे ही सामान्य बाब आहे, मात्र काहीवेळा ही गाठ कर्करोगाची असू शकते. कर्करोगांच्या पेशींपासून तयार झालेली ही गाठ हळूहळू पसरत जाऊन आजार बळावू शकतो. त्यामुळे काखेत व मानेत गाठी येतात. कर्करोगाचे निदान झाले की रुग्णाच्या मनावर आघात होतो, मात्र, रोगाला सकारात्मकपणे स्वीकारले, तर औषधोपचारांचा फायदा होतो. स्तन हे स्त्रीच्या शरीरातील महत्त्वाचे अंग असते. शस्त्रक्रियेद्वारे स्तन काढल्यावर महिलेला मानसिक धक्का बसण्याची शक्यता असते. त्यावर मानसोपचार आवश्यक ठरते.

कॅन्सरचे दोनशेहून अधिक प्रकार आहेत. कॅन्सर कोणत्याही पेशीमध्ये, कोणत्याही उती व अवयवामध्ये होऊ शकतो. सर्व कॅन्सरमधील समान दुवा म्हणजे अनिर्बंध पेशींची वाढ होय. सामान्यपणे पेशी विभाजन क्रमाक्रमाने व नियंत्रित पद्धतीने होते. शरीराच्या आवश्यकतेनुसार नव्या पेशी जुन्या पेशींची जागा घेतात. पेशी विभाजनाची ही नेहमीची पद्धत आहे. कधी कधी पेशी विभाजन नव्या पेशींची आवशकता नसताना होत राहते. या अतिरिक्त पेशींचे गाठोडे म्हणजे अर्बुद किंवा ट्यूमर. आयुष्याच्या कोणत्याही कालखंडामध्ये कर्करोग होऊ शकतो. काही प्रकारचे कर्करोग लहान मुलांमध्ये होतात. उदाहरणार्थ डोळ्याच्या दृष्टिपटलाच्या पेशींच्या कर्करोग, बहुतेक प्रकारचे ल्यूकेमिया–रक्ताचे कर्करोग लहानपणी होतात. स्तनांचा, प्रोस्टेट–पौरुष ग्रंथी, आणि मोठ्या आतड्याचा कर्करोग प्रौढपणी होतो. कर्करोगावर उपचार करण्याच्या पद्धती अनेक आहेत. रोगाचे निदान लवकर झाल्यास शस्त्रक्रिया हा पहिला उपचार आणि रेडिएशन किंवा केमोथेरपी केल्याने रोगावर नियंत्रण आणता येऊ शकते. कर्करोगाचे अनेक प्रकार असल्याने एकाच प्रकारचा उपचार कॅन्सर बरा करू शकत नाही. अचूक निदान आणि दररोज नव्या औषधांची पडणारी भर यामुळे ५८ टक्के कॅन्सर बरे होतात किंवा आटोक्यात राहू शकतात. ६३ टक्के कॅन्सरमध्ये उपचारानंतर रुग्ण सामान्य आयुष्य जगू शकतो. कोणाला कर्करोग होण्याची शक्यता अधिक आणि कोणाला नाही हे मात्र अजून नक्की सांगता येत नाही. कॅन्सर कोणाला होण्याची शक्यता आहे हे मात्र सांगता येते. कॅन्सरचा धोका काही व्यक्तींमध्ये वाढतो. त्याचप्रमाणे काही उपायामुळे कॅन्सर धोक्याचे प्रमाण कमी होते

कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत जनजागृती करणे, माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. कर्करोगविषयक उपलब्ध माहिती तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यात झालेली लक्षणीय प्रगती यामुळे रोगप्रसारामध्ये कपात होणे अपेक्षित आहे, परंतु जागतिक आकडेवारीनुसार दरवर्षी कर्करोगाचे नव्याने निदान होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत भर पडत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, कर्करोगाच्या माहितीचा प्रसार करून कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येऊ शकते. यासाठी कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरातील कर्करोग संस्था आणि आरोग्य संघटनांमार्फत जागतिक कर्करोग दिवस साजरा केला जातो. कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी ७०% मृत्यू अल्पविकसित देशांमध्ये होत असल्याकारणाने अशा ठिकाणी कर्करोग आणि त्याचा प्रतिबंध याबद्दल जनजागृती करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवस हे एक महत्त्वाचे साधन आहे.

आपल्या राज्यात कर्करोग विरोधी मोहीम ही युद्धपातळीवर राबविली जाते. शासनामार्फत वेळोवेळी करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे नागरिकांमधील कर्करोग तपासणीचे प्रमाण वाढले असून त्यामुळे तत्काळ उपचार होण्यास मदत होत आहे. कर्करोगावरील उपचार हे खर्चीक असून रुग्णाला आवश्यक असणाऱ्या शस्त्रक्रिया महाग आहेत. त्यामुळे गोरगरीब व सामान्य नागरिकांना या आजाराचा सामना करणे कठीण जाते, परंतु राज्य सरकारच्या महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत ९९६ आजारांवर उपचार केले जातात, तर पंतप्रधान जीवनदायी योजनेतून एक हजार २०९ आजारांवर उपचार होतात. याशिवाय महापालिका व राज्य शासनाच्या रुग्णालयात उपचार घेणाऱ्यांना काही विशिष्ट आजारांसाठी लाभ दिला जातो. विशेषतः या योजनेमुळे कॅन्सर ग्रस्त रुग्णांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य शासनाने २१ नोव्हेंबर २०१३पासून ही योजना राज्यव्यापी केलेली आहे. २ जुलै २०१२पासून राजीव गांधी जीवनदायी योजना या नावाने ही योजना सुरू झाली व १३ एप्रिल २०१७च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या नावाने सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. २३ सप्टेंबर २०१८पासून आयुषमान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेबरोबर एकत्रितपणे राबविण्यात येते.

कर्करोगविषयक संशोधन व चिकित्सा करण्यासाठी सर दोराबजी टाटा विश्वस्त मंडळाने टाटा मेमोरियल हॉस्पिटल १९४१मध्ये मुंबई येथे स्थापन केले. हैदराबाद, मद्रास व कलकत्ता येथेही कर्करोगाचे निदान व चिकित्सा करणाऱ्या संस्था स्थापन झालेल्या आहेत. १९५२ मध्ये कर्करोगविषयक संशोधन करण्यासाठी मुंबई येथे इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटर ही संस्था स्थापन झाली. त्यानंतर तुर्भे येथील अणुऊर्जा संशोधन संस्थेचेही या संशोधनास सहकार्य लाभले. इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटरमार्फत तेथील संशोधनावर आधारलेले निबंध प्रसिद्ध झालेले आहेत. या संशोधनाबरोबरच कर्करोगासंबंधी साधारण जनतेत ज्ञानप्रसार करून शिक्षण देणे व कर्काचे निदान शक्य तितक्या लवकर करून त्वरित उपाय करण्याचे कामदेखील या संस्थांमार्फत केले जाते. नवी मुंबईतील खारघर येथे उभारण्यात आलेले कॅटरॅक या संशोधन केंद्रात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या सहकार्याने आतापर्यंत लाखो रुग्णांचे प्राण वाचले आहेत. ५० हजारांपेक्षा अधिक रुग्णांवर केमोथेरपी करण्यात आली, तर नऊ हजारांपेक्षा अधिक रुग्णांना रेडिओ थेरपी उपचार केले गेले आहेत. याशिवाय पाच हजारांपेक्षा अधिक कर्करुग्णांच्या शस्त्रक्रिया पार पडल्या. कोरोना काळात शासकीय तसेच बहुतेक खाजगी रुग्णालयांनी सामान्य रुग्णांना उपचार नाकारले जात होते. अशावेळी कॅन्सर रुग्णांना उपचार मिळणे कठीण झाले होते. कोरोनाच्या भीतीपोटी बहुतेक रुग्णालयांतून सामान्य रुग्णांवर उपचार करणे टाळले जात असताना महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या रुग्णालयातून ४७ हजार कर्करुग्णांवर झालेले उपचार ही मोठी कामगिरी आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांना सर्वसाधारण शस्त्रक्रिया, नेत्र शस्त्रक्रिया, स्त्री रोगावरील शस्त्रक्रिया, अस्थिव्यंग शस्त्रक्रिया, हृदय शस्त्रक्रिया व उपचार, जठर व आतड्याच्या शस्त्रक्रिया व उपचार, बालरोग शस्त्रक्रिया व उपचार, मेंदू व मज्जासंस्था यांचे आजारावरील शस्त्रक्रिया व उपचार, प्लास्टिक सर्जरी, जळीत रुग्णावरील उपचार, कृत्रिम अवयव, आकस्मिक वैद्यकीय उपचार, त्वचेच्या, सांध्याच्या व फुफफुसाच्या आजारावरील आकस्मिक उपचार, ऐनडोक्राईन, लहान मुलांचे कर्करोग, मानसिक आजार व इंटरव्हेशनल रेडीऑलोजी उपचार यांचा लाभ मिळतो. १५५३८८/१८००२३३२२०० या टोल फ्री नंबरवर लाभार्थी योजनेची माहिती घेऊ शकतात तसेच सेवेबाबत तक्रार करू शकतात. या योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबाला प्रति कुटुंब प्रति वर्ष १.५० लक्षपर्यंत विमा संरक्षण मिळते. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा २.५० लक्ष आहे.

आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना ही आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्करोगावर नियंत्रण राखण्यासाठी आणि पर्यायाने जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिवसाचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना जागतिक कर्करोग दिवसानिमित्त कर्करोगाशी निगडित रूपरेखा जाहीर करते. या रूपरेखेला अनुसरून विविध आरोग्य संस्था आणि कर्करोग उपचार केंद्र यांद्वारे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. या संस्थांद्वारे त्यांच्या संकेतस्थळांवर कर्करोगाविषयी माहिती प्रसारित केली जाते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना स्थानिक आरोग्य संस्थांच्या साहाय्याने संमेलने, व्याख्याने, प्रदर्शने तसेच निधी उभारणी कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही देशांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमांद्वारे विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात.

**–प्रवीण डोंगरदिवे, माहिती सहायक, विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई**

## जल जीवन मिशन म्हसळ्यातील चार गावांना निधी मंजूर

**म्हसळा : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या जल जीवन मिशन योजनेतून म्हसळा तालुक्यातील केलटे ग्रामपंचायत हद्दीतील चंदनवाडी, मांदाटणे, साळविंडा आणि तोराडी या चार गावांना एकूण दोन कोटी ३९ लाख एक हजारांचा निधी मंजूर झाला आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्र. उपअभियंता युवराज गांगुर्डे यांनी ही माहिती दिली.

जल जीवन मिशन योजनेसाठी ४५ टक्के केंद्र शासन, ४५ टक्के राज्य शासन व १० टक्के स्थानिक लोकवर्गणी असे आर्थिक नियोजन असते. २०२४पर्यंत नळजोडण्यांचे हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची सर्व यंत्रणांनी अंमलबजावणी करायची आहे.


### नावात बदल

माझे जुने नाव **सरोजा केशवन,** राहणार (पत्ता) : रुम नं. ३०१, चंद्रदर्शन अविष्कार अपार्टमेंट, सेक्टर–६, प्लॉट नं. ५८, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६. हे माझे जुने नाव असून, मी **प्रतिज्ञापत्र क्र. १७६८/२०२२ दि. ११/०२/२०२२** रोजी **सौ. सरोजा तंगवेल कांगाई** असे बदलले असून, या पुढे मी या नवीन नावाने ओळखली जाईन.

**दि. ११/०२/२०२२**

**सही/–**
**सरोजा तंगवेल कांगाई**
नवीन नाव

### कागदपत्रे हारविलेबाबत

पल्लवी शहाजी डोंगरे, पुष्प विनायक कॉम्प्लेक्स बि. नं.–३, पहिला मजला, रुम नं. ३०५, आदई, रायगड, महाराष्ट्र – ४१०२०६ यांचेकडून मानखुर्द येथे प्रवास करित असताना खालील कागदपत्र ६/३/२०२१ रोजी सकाळी कोठेतरी पडून हरवले आहे. त्याबाबत मानखुर्द पोलीस ठाणे येथे दिनांक ६/३/२०२१ नोंदणीकृत दस्त क्र. पवला–६४५६/२०१४ रोजी नोंद केली आहे.

**हरविलेले कागदपत्रे –**
माझी वैयक्तीक फाईल, घराचे मुळ करारनामा, ॲग्रीमेंट पेपर, ओरिजनल बक्षीसपत्र, बाईकचे ओरिजनल आर. सी. बुक, आधाकार्ड, पॅनकर्ड झेरॉक्स.

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास पल्लवी शहाजी डोंगरे यांचेकडे आणून द्यावे अथवा खालील फोन नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक : ७०४५५००७९९**

**सही/–**
**पल्लवी शहाजी डोंगरे**

RayatShikshanSanstha's

**Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel, Dist. Raigad, Maharashtra, 410206.**

**Advertisement for Junior Research Fellow (JRF) Position under DST-SERB Funded Project**

| | |
|---|---|
| Name Of the Position | Junior Research Fellow (One Position) SERB-DST Funded Project |
| Name of place of work | RayatShikshanSansth's Mahatma Phule Arts Science Commerce College Panvel, Maharastra 410206. |
| Condition | Purely temporary in nature. |
| Essential qualification | M. Sc. in Physics, candidates must beNET/SET/ GATE qualified or National level Examinations conducted by Central Government Departments and their agencies and different Institutions. |
| Fellowship | Rs.31000/-Per monthalong with HRA as per DST-SERB guidelines. |
| How to apply | Interested Candidates are requested to send their application, CV, and relevant documents to Dr.Girish S. Gund by email (grsh.gund@gmail.com) on or before 26/02/2022. |

**Note:TA/DA will not be paid** to attend the interview.Only shortlisted candidates will be called for interview.
For details and other terms and condition, visit to website:http://mpasccollege.edu.in/index.php

sd/-
Principal Investigator
Department of Physics.

sd/-
Principal,
Mahatma Phule A.S.C. college, Panvel.

# भारताचा विंडीजला ‘व्हाईटवॉश’



## तिसरी वनडेही मोठ्या फरकाने जिंकली

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

मुंबईकर श्रेयस अय्यर (१११ चेंडूंत ८० धावा), यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत (५४ चेंडूंत ५६) यांची अर्धशतके आणि गोलंदाजांच्या सांघिक कामगिरीच्या बळावर भारताने तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडिजला ९६ धावांनी धूळ चारली. भारताने ही मालिका ३-० अशी जिंकली.

भारताने दिलेल्या २६६ धावांचा पाठलाग करताना विंडीजचा डाव ३७.१ षटकांत १६९ धावांत आटोपला. मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णा यांनी प्रत्येकी तीन बळी मिळवले. भारताने विंडीजविरुद्ध प्रथमच एकदिवसीय मालिकेत निर्भेळ यश संपादन केले. सामनावीर म्हणून श्रेयस अय्यर, तर मालिकावीर म्हणून प्रसिध कृष्णाला गौरविण्यात आले.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय भारताच्या अंगलट आला. कर्णधार रोहित शर्मा (१३), विराट कोहली (०) यांना अल्झारी जोसेफने चौथ्याच षटकात माघारी पाठवले, तर अनुभवी धवनसुद्धा (१०) दहाव्या षटकात बाद झाला. ३ बाद ४२ धावांवरून अय्यर आणि पंत यांनी चौथ्या गड्यासाठी ११० धावांची भागीदारी रचली. अय्यरने नववे, तर पंतने पाचवे अर्धशतक झळकावले. हेडन वॉल्शने पंतला बाद करून ही जोडी फोडली. त्यानंतर सूर्यकुमार यादवही (६) स्वस्तात परतला. त्यामुळे अय्यरवरील दडपणात वाढ झाली आणि तोसुद्धा मोठा फटका खेळण्याच्या नादात वॉल्शच्या गोलंदाजीवर बाद झाला. मग सुंदर आणि चहर यांनी सातव्या गड्यासाठी ५३ धावांची भर घालून भारताला अडीचशे धावांपलीकडे नेले. जेसन होल्डरने मोहम्मद सिराजचा त्रिफळा उडवून भारताचा डाव ५० षटकांत २६५ धावांवर गुंडाळला.

लक्ष्याचा पाठलाग करताना विंडीजने सातत्याने बळी गमावले. आठ बाद १२२ धावांवरून हेडन वॉल्श (१३) आणि जोसेफ यांनी ४७ धावांची भागीदारी करून भारताला झुंजवले, मात्र त्यांना विजयीरेषा ओलांडता आली नाही. कृष्णाने जोसेफला बाद करून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

**संक्षिप्त धावफलक**

भारत : ५० षटकांत सर्व बाद २६५ (श्रेयस अय्यर ८०, ऋषभ पंत ५६; जेसन होल्डर ४/३४) विजयी वि. वेस्ट इंडिज : ३७.१ षटकांत सर्व बाद १६९ (ओडेन स्मिथ ३६; प्रसिध कृष्णा ३/२७, मोहम्मद सिराज ३/२९).



## कर्णधार रोहित शर्माचा पराक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाने वेस्ट इंडिजला वनडे मालिकेत ३-० अशी धूळ चारली. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगलेल्या तिसऱ्या वनडेत भारताने ९६ धावांनी दणदणीत विजय नोंदवला. टीम इंडियाचा पूर्णवेळ कप्तान म्हणून रोहित शर्माचा हा पहिला वनडे मालिकाविजय आहे. या विजयासह एक मोठा पराक्रम केला आहे.


भारतीय संघाने पहिल्यांदाच वेस्ट इंडिजला वनडे मालिकेत व्हाइटवॉश दिला आहे. भारताने एकूण १२व्यांदा एखाद्या संघाला वनडेत व्हाइटवॉश दिला. महेंद्रसिंह धोनी आणि विराट कोहली यांनी वनडे मालिकेत कर्णधार म्हणून तीन वेळा विरोधी संघाला क्लीन स्वीप दिला आहे. याशिवाय कपिल देव, दिलीप वेंगसरकर, मोहम्मद अझरुद्दीन, गौतम गंभीर आणि अजिंक्य रहाणे यांनीही वनडे मालिकेत त्यांच्यासमोरच्या संघाला एकदा व्हाइटवॉश दिलाय.

प्रो कबड्डी लीग

## यूपी योद्धाची जयपूरवर मात

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगमध्ये शुक्रवारी झालेल्या सामन्यात प्रदीप नरवालच्या तीन सुपर रेडच्या जोरावर यूपी योद्धाने जयपूर पिंक पँथर्सला ४१-३४ असे पराभूत केले. या विजयासह यूपीचा संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानी, तर जयपूरचा संघ सहाव्या स्थानी आहे.



त्याआधी पहिल्या सामन्यात हरियाणा स्टीलर्सचा ४५-२७ असा पराभव करीत नववा विजय नोंदवला. पुण्याच्या शानदार विजयाने त्यांच्या प्लेऑफच्या आशा अजूनही जिवंत आहेत. हरियाणाचा १९ सामन्यांतील हा सातवा पराभव असून ते तिसऱ्या स्थानावर आहेत.

पूर्वार्धानंतर पुण्याचा संघ २६-७ असा पुढे होता. हरियाणाने सामन्याच्या सहाव्या मिनिटाला पुण्याला सर्वबाद करून जबरदस्त आघाडी घेतली होती. हे सत्र संपण्यापूर्वी पुण्याने पुन्हा एकदा हरियाणाला ऑलआऊट केले आणि पहिल्या २० मिनिटांतच सामना जवळपास एकतर्फी केला.

उत्तरार्धाच्या सुरुवातीला पुण्याने पुन्हा एकदा हरियाणाला ऑलआऊट केले आणि ३०व्या मिनिटाला सामन्यात मोठी आघाडी घेतली. पुण्यासाठी मोहित गोयतने सुपर १० पूर्ण केला आणि सामन्यात दोन टॅकल पॉइंटसह १२ गुण घेतले. अस्लम इनामदारने अष्टपैलू कामगिरी करताना सहा रेड आणि दोन टॅकल पॉइंट घेतले. हरियाणासाठी आशिषने अष्टपैलू कामगिरी करताना पाच रेड आणि तीन टॅकल पॉइंट्स घेतले, परंतु कर्णधार विकास कंडोला वाईटरित्या फ्लॉप ठरला.





**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे कामोठे चिटणीस सुरेंद्र हळ्ळीकर यांच्या वतीने शिवजयंती उत्सवानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या, तर त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी भाजप कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चा चिटणीस सुरेंद्र हळ्ळीकर, नितीन शिंदे, प्रवीण कोरडे, सचिन शिंदे, मिलिंद सोनावणे, चंदू रोहन राणा आदी उपस्थित होते.**



**पनवेल : महापालिका हद्दीतील तोंडरे येथे तोंडरे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी भेट दिली. त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, प्रभाग समिती ‘अ’च्या सभापती संजना कदम, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष दिनेश खानावकर, पडघ्याचे माजी सरपंच कृष्णा पाटील, भाजप नेते प्रकाश खैरे, अशोक साळुंखे, ज्ञानेश्वर डोंगरे, युवा नेते महेश पाटील, तोंडरे गावचे माजी उपसरपंच श्रीनाथ पाटील, बूथ अध्यक्ष अभिमन्यू पाटील, युवा कार्यकर्ते मेघनाथ पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप महिला मोर्चाच्या तालुका सरचिटणीस शिल्पा म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप युवा कार्यकर्ते रवींद्र म्हात्रे, महिला मोर्चाच्या कविता मते, ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हा सदस्य माई गायकवाड, सुषमा भागीत आदी उपस्थित होते.**

## अमित कदम, श्रेयस पाटील बनले राष्ट्रीय बुद्धिबळ पंच



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने चेस फोर एव्हरीवन या उपक्रमांतर्गत पाच दिवसीय (३० तासांचे) राष्ट्रीय पंच प्रशिक्षण शिबिर ऑनलाइन घेतले. यामध्ये रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेतर्फे सहभागी झालेले अमित कदम आणि श्रेयस पाटील यांनी वरिष्ठ राष्ट्रीय पंच म्हणून बहुमान संपादन केला आहे.

राष्ट्रीय पंच प्रशिक्षण शिबिरासाठी रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेतर्फे राज्यस्तरीय पंच परीक्षेत अ श्रेणी मिळविलेले अमित कदम आणि श्रेयस पाटील यांची निवड करण्यात आली होती. शिबिर पूर्ण करून घेतलेल्या सहभागी सर्वांची लेखी, प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. लेखी परीक्षेत कदम आणि पाटील यशस्वी झाले. त्यांना जागतिक बुद्धिबळ संघटनेतर्फे (फिडे) राष्ट्रीय पंच (नॅशनल आर्बिटर) असे लायसन्स देण्यात येणार आहे.

संपूर्ण भारतातून या शिबिरातून राष्ट्रीय पंच म्हणून ४८१ जण उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेत अ व ब श्रेणी मिळालेल्या सर्वांना जागतिक बुद्धिबळ संघटनेकडून (फिडे) नॅशनल आर्बिटर लायसन्स, तर सीनियर नॅशनल आर्बिटर टायटल अशा पदवीचे प्रमाणपत्र देण्यात आले. महाराष्ट्रामधून २९ जण उत्तीर्ण झाले आहेत. यात २४ जण ब श्रेणीमध्ये, तर पाच जण क श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

श्रेयस पाटील हा सीकेटी कॉलेजमध्ये एमएससी (कम्प्युटर सायन्स)करीत आहे. तो मेढेखार गावातील बुद्धिबळाचे प्रशिक्षक, आयोजक तसेच पंच असलेले सी. एन. पाटील यांचा पुत्र आहे. पाटील व कदम या दोघांना रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे आणि पनवेल चेस असोसिएशनचे सचिव सी. एन. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सीनियर नॅशनल आर्बिटर झाल्याबद्दल यशस्वी दोघांचेही रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटना आणि बुद्धिबळपटूंकडून या दोघांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

## मनिका बात्राच्या लढ्याला अखेर न्याय

■ **टेबल टेनिस महासंघावर प्रशासकाची नियुक्ती**



*देशातील न्याय व्यवस्थेवर माझा पूर्ण विश्वास आहे. देशाचे नाव उंचावण्यासाठी मी माझे आयुष्य पणाला लावले आहे. मी केंद्र सरकार आणि माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या देशवासीयांची आभारी आहे.*

*-मनिका बात्रा*

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आघाडीची टेबल टेनिसपटू मनिका बात्राच्या लढ्याला अखेर न्याय मिळाला आहे. भारतीय टेबल टेनिस महासंघाच्या कार्यकारिणीला निलंबित करीत प्रशासक नेमण्याचे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले आहेत.

राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेती आणि खेलरत्न पुरस्कारप्राप्त बात्राने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती रेखा पल्ली यांनी हा निर्णय दिला. मनिकाने दाखल केलेल्या सामनानिश्चितीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. सामनानिश्चिती करण्याची सूचना देणाऱ्या प्रशिक्षकाला संघटना पाठीशी घालत असल्याचे समितीच्या अहवालात स्पष्ट झाले आहे.

गतवर्षी आशियाई टेबल टेनिस स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान न देण्यात आलेल्या मनिकाने राष्ट्रीय प्रशिक्षक सौम्यदीप रॉय यांच्यावर आरोप करीत न्यायालयात धाव घेतली होती. रॉय यांनी त्यांच्याकडे खासगी प्रशिक्षण घेणाऱ्या एका खेळाडूसाठी मनिकाला ऑलिम्पिक पात्रता लढत गमावण्याची सूचना केली होती.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com